

दैनिक महाराष्ट्र
# सूर्योदय
www.esuryoday.in Email :daily.suryoday@gmail.com
मुख्य संपादक : गंगाधर काळकुटे

बीड || वर्ष १० वे || अंक २८५ || शुक्रवार, दि.०९ ऑगस्ट २०२४ || RNI No.MAHMAR/2014/54581 || Postal Regd No.L/74/RNP/Beed/2019-21 || पाने ४ किंमत २ रुपये ||


# ईडब्ल्यूएस रद्द करण्याची मागणी मराठ्यांची नाही

## आश्वासन पूर्ण केली नाहीत तर सरकार जाणार; जरांगे पाटलांचा हल्लाबोल

**सोलापूर। प्रतिनिधी**

**गेल्या काही दिवसापासून राज्यात मराठा आरक्षणाची मागणी सुरू आहे. आज मनोज जरांगे पाटील सोलापूर दौऱ्यावर असतांना मनोज जरांगे पाटील यांनी पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी मंत्री छगन भुजबळ आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका केली. 'तिनही बाजूंनी यांनी मराठ्यांचं वाटुळं केलं आहे. तुम्ही दहा टक्के आरक्षण देऊन आमचं वाटूळं केलं. ईडब्ल्यूएस रद्द करुनही मराठ्यांचं वाटुळ केलं आहे', असा आरोपही मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारवर**

केला.

यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी प्रकाश आंबेडकर यांना प्रत्युत्तर दिले, दोन दिवसापूर्वी आंबेडकर यांनी सगेसोयऱ्याची व्याख्या आणि मागणी आम्हाला मान्य नाही असं सांगितलं होतं. यावर बोलताना जरांगे पाटील म्हणाले, ते आता सत्तेत कुठे आहेत. त्यांना मान्य आहे की नाही यापेक्षा आम्हाला सरकारने आश्वासन दिले आहे हे महत्वाच आहे. आश्वासन पूर्ण केलं नाहीतर सरकार जाणार, अशी टीकाही जरांगे पाटील यांनी केली. सरकार फक्त भुजबळ यांचे ऐकत आहे, त्यांना बळ देण्याचं काम फडणवीस करत आहेत. त्यांना आता भोगाव लागणार आहे. सरसकट मराठ्यांना आरक्षण द्यायला पाहिजे. यो लोकांमुळे राज्यातील भाजप संपवणार आहेत, असा आरोपही जरांगे पाटील यांनी केला. आम्हा गरीब मराठ्यांना आरक्षण हवं हेच फक्त दिसत आहे. आम्ही जातीसाठी भिजत आहे. तुम्हीच आरक्षण दिलं म्हणून मराठ्यांनी परत तुम्हाला आणलं, आता परत नाही दिलं तर परत घालवणार. हे सरकार विचित्र आहे. हे आधी देतात आणि परत घेतात. एका बाजूने द्यायचं आणि दुसऱ्या बाजूने वाटुळं करायचं. नोंदी शोधल्या पण प्रमाणपत्र देण्यासाठी कक्षच नाही, असंही जरांगे पाटील म्हणाले.

### ईडब्ल्यूएस रद्द करण्याची मागणी नव्हती

हे लोक जाणून बुजून घात करत आहेत, १० टक्के मागितलं नाही तरीही कायदा पारित केला आणि ईडब्ल्यूएस रद्द केलं.ईडब्ल्यूएस रद्द करण्याची मागणी मराठ्यांची नव्हती. आता त्याचाही फायदा होत नाही. प्रमाणपत्र तातडीने देऊ नका असंही सरकारने सांगितलं आहे. तिनही बाजूंनी त्रास देत आहेत. दहा टक्के आरक्षण देऊन मराठ्यांचं वाटोळ केल्याचं लोकांच्या लक्षात आले आहे आणि ही सगळी चाल देवेंद्र फडणवीस यांची आहे, असा आरोपही मनोज जरांगे पाटील यांनी केला.

# बाजार समितीची जमीन विक्री प्रक्रिया कायदेशीर

## शासनाच्या परवानगीनेच होतोय व्यवहार–जयदत्त नरवडे

**बीड। प्रतिनिधी**

**शहरालगत असलेल्या बाजार समितीची साडेचार एकर जमीन पणन संचालकांच्या परवानगीने व अटी व शर्तीच्या अधीन राहून विक्री केली असून सर्व प्रक्रिया इ–टेंडर केली असून जमीन विक्री प्रक्रिया संपूर्ण पणे कायदेशीर रित्या केली असल्याची माहिती बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.**

प्रसिद्धस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मालकीची मंजरथ रोड लगतची माजलगाव नगर परिषद हद्दीतील साडेचार एकर जमीन आहे ज्याचे शासकीय मूल्यांकन तीन कोटी ३४ लाख ८७ हजार ७३४ असून या किंमती पेक्षा जास्तीची रक्कम बाजार समितीने तीन कोटी ३७ लाख रुपये एवढी ठरवली असून या पेक्षा जो कोणी ई–निविदा भरेल त्यासजमीन जमीन करण्याचे बाजार समितीचे नियम ,अटी व शर्तीच्या आधीन राहून विक्री केली आहे सदरील विक्रीतून येणारी रक्कम ही कृषी उत्पन्न बाजार समितीने कृषी पणन मंडळाकडून घेतलेले कर्ज भरणा करण्यात येणार आहे या बाजार समितीने टी एम सी प्रकल्प व मुख्य बाजार आवार फुले पिंपळगाव येथील रस्ते ,लाईट,पाणी व्यवस्था इत्यादी विकास कामासाठी सन २००७व २००९ मध्ये दोन कोटी कर्ज घेतले होते यापैकी बाजार समितीने ७० लाख रुपये मुद्दल व ४५ लाख रुपये व्याज भरणा केलेले आहे सद्यस्थितीत

# भाई थावरेंनी घेतली शरद पवारांची भेट

**माजलगाव। प्रतिनिधी**

शेतकरी नेते भाई गंगाभिषण थावरे यांनी दि ०८ ऑगस्ट गुरुवार रोजी दिल्ली येथे राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांची भेट घेऊन माजलगाव मतदारसंघातून उमेदवारी मागितली.यावेळी पवार यांनी थावरे यांच्या खांद्यावर हात ठेवत सकारात्मक प्रतिसाद दिला. शेतकरी संघर्ष समितीच्या माध्यमातून भाई गंगाभिषण थावरे गेल्या चाळीस वर्षांपासून माजलगाव

पान २ वर

# अण्णाभाऊ साठे केवळ साहित्यिकच नव्हते ते स्वातंत्र्य सैनिकही होते–प्रा. सुशीलाताई मोराळे

**बीड। प्रतिनिधी**

**अण्णाभाऊ हाडाचे कम्युनिस्ट होते त्या काळात देशात दोनच पक्ष होते एक काँग्रेस दुसरा कम्युनिस्ट पक्ष. मुंबईत अण्णाभाऊ कम्युनिस्ट नेत्यांच्या संपर्कात आले. कॉम्रेड डांगे हे कम्युनिस्टांचे नेतृत्व करत होते. त्या काळात मुंबई गिरणी कामगारांची संख्या फार मोठी होती आण्णा काम शोधण्यासाठी गिरण गावात जात असत हाडाचा हा शाहीर गाणी म्हणायचा करमणूक करायचा. त्यांच्यातला हा गुण कम्युनिस्ट नेते कॉम्रेड प्र.के. अत्रे यांनी हेरला आणि हा विद्रोही शाहीर देशाला महाराष्ट्राला आणि विश्वाला दिला असे प्रतिपादन थोर विचारवंत प्रा. सुशीला मोराळे यांनी अण्णाभाऊ साठे जयंती निमित्त राळसांगवी येथे त्या बोलताना केले.**

अण्णाभाऊ भारतातील एकमेव लेखक आहेत ज्यांचे साहित्याचे भाषांतर भाषांतर जगातल्या २७ भाषेत झाले आहे. अण्णाभाऊ रशियाला गेले तिथले वास्तव त्यांनी बघितले तिथला माणूस सुखी जीवन जगताना त्यांनी पाहिला. भारतातही अशीच व्यवस्था असली पाहिजे असे त्यांचे मत होते. परंतु भारतात मोठ्या प्रमाणावर जातीव्यवस्था असल्यामुळे इथला समाज ६,७४३ जातीत विभागला आहे. रशियात फक्त वर्ण व्यवस्था आहे म्हणून तिथे शक्य झाले आता तर पुरोगामी विचार दिवसेंदिवस कमजोर होत आहे धर्मांध शक्तींनी आपल्या देशात अंतर्गत आणि देशाबाहेर घेरले आहे. नेपाळ, श्रीलंका, पाकिस्तान, चीन अता बांगलादेशात भारताविरुद्ध षडयंत्र सुरू आहे. देशातही धर्माचे स्टोम माजवले जात आहे. अण्णाभाऊ फक्त साहित्यिक नव्हते क्रांतिसिंह नाना यांचे सोबत त्यांनी स्वातंत्र्य आंदोलनात भाग घेतला ते हयात

पान २ वर

# ज्येष्ठ नागरिकांसाठी गेवराईत विशेष आरोग्य तपासणी शिबिराचेआयोजन

**गेवराई। प्रतिनिधी**

केंद्र व राज्य सरकारच्या सूचनेनुसार जेष्ठ नागरिकांना त्यांचे जीवन अधिक चांगले आनंदी जगता यावे, त्यांचे आरोग्य परिपूर्ण असावे यादृष्टीने विविध प्रकारचे निर्णय घेतले आहेत. त्याचाच एक भाग म्हणून गेवराई तालुक्यातील ज्येष्ठ नागरिकांची शुक्रवार दि. १६ ऑगस्ट रोजी गेवराई येथील शासकीय उपजिल्हा रुग्णालयात विविध प्रकारच्या आजारांची तपासणी करण्यात येणार आहे. सकाळी ९.३० ते १२.३० या कालावधीत विविध विषयांचे तज्ञ डॉक्टर रुग्णांची तपासणी करणार आहेत तसेच विविध प्रकारच्या चाचण्याही निशुल्क पद्धतीने करण्यात येणार आहेत. या तपासणी शिबिराचा लाभ सर्वांना घेता यावा म्हणून जेष्ठ नागरिक संघटनेच्या वतीने उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुरज कोठावळे यांची जेष्ठ नागरिक समन्वय समिती शिष्टमंडळाने जुलैमध्ये भेट घेऊन चर्चा केली होती. त्याचा परिणाम म्हणून प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शुक्रवारी ज्येष्ठ नागरिकांची विशेष

पान २ वर

# राज ठाकरे आज जिल्हा दौऱ्यावर

## विधानसभानिहाय घेणार पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक

**बीड। प्रतिनिधी**

**लोकसभा निवडणुकीत महायुतीला बिनशर्त पाठिंबा दिल्यानंतर नवनिर्माण सेना आगा विधानसभा निवडणुक स्वबळावर लढणार आहे. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी महाराष्ट्र दौरा सुरु केला असून पहिल्या टप्प्यात त्यांनी मराठवाड केंद्रीत केला आहे. दरम्या शुक्रवारी (दि.९) मनसे अ राज ठाकरे बीड जिल्हा दौऱ्यावर यणार असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष सुमंत धस यांनी दिली.**

लोकसभा निवडणुकीनंतर आता महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीचे वारे आहेत. सर्व राजकीय ांनी या निवडणुकीची यारी सुरु केली आहे. मनसेने देखील निवडणुकीच्या मैदानात उतरण्यासाठी कंबर कसली आहे. यंदाच्या विधानसभा निवडणुकीत मनसेची भूमिका महत्वाची सणार आहे. लोकसभा णुकीआधी राज ठाकरे यांनी महायुताला पाठिंबा जाहिर केला. मात्र आता नुकत्याच झालेल्या मनसेच्या मेळाव्यात मात्र राज ठाकरे यांनी मनसे महाराष्ट्रात विधानसभेच्या २५५– २५० जागा लढवणार असल्याचे जाहिर केले आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज ठाकरे यांनी महाराष्ट्र दौरा सुरु केला आहे. दौऱ्याच्या पहिल्या टप्प्यात मनसे अध्यक्ष राज ठाकरे सोलापूरनंतर मराठवाड्या दौऱ्यावर आहेत. सोलापूर, धाराशिव, नांदेड ,लातूर, हिंगोली, परभणी नंतर शुक्रवारी (दि.९) राज ठाकरे यांचे दुपारी १२ वाजता माजलगाव मार्गे बीड जिल्ह्यात आगमन होणार आहे.१ वाजता बीड शहरातील हॉटेल अन्विता येथे राज ठाकरे यांचे आगमन होईल. यानंतर राज ठाकरे जिल्ह्यातील पदाधिकारी, कार्यकर्त्यांची बैठक घेऊन विधानसभा मतदारसंघनिहाय

पान २ वर

# शेतकऱ्यांचे अनुदान तत्काळ जमा करा– राजेंद्र आमटे

**बीड। प्रतिनिधी**

निवडणुका आल्या की शेतकऱ्यांच्या नावावर मताचा जोगवा मागणाऱ्या सरकारने शेतकरी वाऱ्यावर सोडले आहे. मागील दोन वर्षांपासून शेतकऱ्यांचे तुषार व ठिबक सिंचन अनुदान जमा केलेले नाही यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. शेतकऱ्याने ठिबक सिंचन व तुषार सिंचन बसवण्यासाठी बँका व खाजगी सावकार, पतसंस्था असे व्याजाने कर्ज काढून ठिबक सिंचन व तुषार सिंचन बसवले आहेत परंतु मागील दोन वर्षांपासून शेतकऱ्यांचे तुषार सिंचन व ठिबक सिंचन अनुदान वाटप करण्यात आलेले नाही ते अनुदान तत्काळ जमा करावे व नवीन प्रकरणांना मंजुरी तत्काळ देण्यात यावी, सन २०२३ खरीप हंगामातील भारतीय कृषी विमा कंपनी कडे स्थकीत असलेला पीक विमा तत्काळ जमा करावा, सोयाबीन व कापूस पिकाचे २०२३–२४ वर्षातील शासनाने घोषित

पान २ वर

## शासकीय व निमशासकीय तसेच खाजगी संस्थेत

# तंबाखू मुक्त करण्यासाठी प्रयत्न करावेत–डॉ.अशोक बडे

**बीड। प्रतिनिधी**

**शासकीय व निमशासकीय तसेच खाजगी संस्थेत पूर्णपणे तंबाखू मुक्त करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन जिल्हा शल्य चिकीत्सक डॉ. अशोक बडे यांनी मंगळवारी झालेल्या बैठकीत केले. मंगळवारी राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम, राष्ट्रीय मौखीक आरोग्य आणि राष्ट्रीय फलोरोसीस प्रतिबंध व नियंत्रण कार्यक्रम बीड अंतर्गतची जिल्हास्तरीय समन्वय समितीची बैठक जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या अध्यक्षतेत पार पडली. यावेळी जिल्हा शल्य चिकीत्सक डॉ. बडे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास गंडाळ अति. जिल्हा शल्यचिकीत्सक, डॉ. नागेश चव्हाण उपस्थित होते.**

डॉ. बडे पुढे म्हणाले, तंबाखू नियंत्रणातंर्गत कार्यक्रम जिल्हयात कडक पद्धतीने राबविणे गरजेचे आहे. यासाठी शासनाने कोटपा २००३ लागु असून याची अंमलबजावणी प्रभावीपणे केली गेली तर तरूण पिढी या व्यसनापासून बचावेल आणि भविष्य उज्वल होईल. यासह शासकीय, निमशासकीय आणि खाजगी शैक्षणिक संस्थेच्या परीसरात तंबाखू विक्रीस बंदी आहे. या भागात वांरवार जागृतीही करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या. या बैठकीत राष्ट्रीय मौखीक आरोग्य कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या पीट ॲन्ड फिगर सिअलंट हा शालेय विद्यार्थ्यांना उपयोगी असणारा कार्यक्रम बीड येथील आदित्य दंत महाविद्यालय व रुग्णालय यांचा संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. यासह मुख कर्करोग व मुख कर्करोग पुर्व आजाराचे निदान आता ग्रामिण रुग्णालय व उपजिल्हा रुग्णालय याठिकाणी देखील होणार आहे यामुळे निदान वेळेवर होऊन लवकरात लवकर उपचार चालु होतील, असे सांगण्यात आले. या बैठकीत राष्ट्रीय फलोरोसीस प्रतिबंध व नियंत्रण कार्यक्रमांतर्गत फलोरोसीस बाधीत स्त्रोतांविषयी माहिती सांगून सदरील स्त्रोत तात्काळ बंद करण्यासंबंधीचे आदेश पारीत करण्यात आले. बीड जिल्हयातील जनतेला फलोरोसीस आजाराविषयी माहिती होण्याकरीता जनजागृती वाढविण्याचे आदेश जिल्हा आरोग्य आधिकारी डॉ. गंडाळ, यांनी दिले यावेळी डॉ. महेश माने (जिल्हा क्षयरोग अधिकारी, बीड) डॉ. सिध्देश्वर फड (अधिष्ठाता स्वा. रा. तीर्थ वैद्यकिय महाविद्यालय 'अंबाजोगाई) डॉ. पी. के. पिंगळे (साथरोग वैद्यकिय अधिकारी), श्रीमती करुणा बडमारे (व.रा.स जिल्हा आरोग्य प्रयेगशाळा) जी.एम. खाडे (रासायनीक जी.एस.डि.ए. बीड) डॉ. एस. जी दवडगांवकर (दंत शल्यचिकीत्सक तथा जिल्हा कार्यक्रम अधिकारी (एनटीसीपी) जि.रु. बीड), श्रीमती अंजली निमस्कर (जिल्हा माहिती अधिकारी, बीड) जिल्हयातील सर्व तालुका आरोग्य अधिकारी, डॉ. अभिजीत

पान २ वर

# आ.क्षीरसागरांच्या मध्यस्थीने कंत्राटी कर्मचाऱ्यांचे उपोषण मागे

## काडीवडगाव प्रकल्पावरील बसले होते उपोषणास

**बीड। प्रतिनिधी**

**बीड शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या काडीवडगाव प्रकल्पावरील कंत्राटी कामगारांचे वेतनासाठी सुरु असलेले उपोषण आ.संदीप क्षीरसागरांच्या मध्यस्थीने बुधवारी (दि.७) रोजी कर्मचाऱ्यांनी मागे घेतले.**

माजलगाव बॅकवॉटर मधून बीड शहरासाठी पाणी पुरवठा करणाऱ्या काडीवडगाव प्रकल्पावरील कंत्राटी कामगारांचे गेल्या अनेक दिवसांपासूनचे वेतन न मिळाल्याने उपोषणाला बसले होते. यावर आ. संदीप क्षीरसागर यांनी काडीवडगाव प्रकल्प येथील उपोषणस्थळी भेट घेऊन उपोषणकर्ते व प्रशासन यांच्यात मध्यस्थी करत कर्मचाऱ्यांना उपोषण मागे घ्यायला लावले. उपोषणकर्त्या कामगारांच्या मागण्या शासनदरबारी लावून धरू व त्यांना न्याय मिळवून देऊ असे आ. क्षीरसागर यांनी उपोषणकर्त्यांना आश्वस्थ केले. यावेळी बीड नगरपालिकेच्या मुख्याधिकारी नीता अंधारे, संबंधित विभागाचे अधिकारी यांची उपस्थिती होती.

अग्रलेख

# वक्तव्य आणि वाद!

आज कुणाची माथी कधी भडकतील याचा नेम नाही. म्हणून 'तोल मोल के बोल' ही गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. समाजाचे प्रत्येक क्षेत्र संवेदनशील बनले आहे. एखादी व्यक्ती जे काही बोलते, त्यामागे मतितार्थ काय हे जाणून घेण्यासाठी कोणाकडे वेळ नाही. आपले जसे मत तसे त्याचेही मत असू शकते एवढा विचार करायलाही आपल्याकडे वेळ नाही, संयम तर नाहीच नाही. राजकीय क्षेत्रात तर संवेदनशीलतेला उधाणच आले आहे. समोरची व्यक्ती आपल्या मताशी सहमत नाही ना, मग झोडा त्याला अशी मानसिकता पराकोटीला पोहोचली आहे. महाराष्ट्रात विधानसभेच्या निवडणुका तीन महिन्यांवर येऊन ठेपल्या आहेत. त्यामुळे विविध पक्ष तयारीला लागले आहेत.

प्रत्येक पक्षाच्या नेत्यांच्या राज्यात संपर्क यात्रा, संवाद यात्रा, दौरे सुरू झाले आहेत. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही मोर्चेबांधणी सुरू केली आहे. त्यांनी स्वबळाचा नारा दिला आहे. शिवसेना-भाजप युती तुटल्यानंतर राज ठाकरे यांनी महायुतीबरोबर संधान साधण्यास सुरुवात केली होती. त्यांचा एकच उद्देश होता, तो म्हणजे उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला शह देणे. लोकसभा निवडणुकीत राज ठाकरे यांनी स्वत:चे उमेदवार उभे न करता दिल्लीत अमित शहांना भेटून भाजपला बिनशर्त पाठिंबा दिला होता. पण निवडणुकीत महाराष्ट्रात भाजपला त्याचा काहीच फायदा झाला नाही. भाजपला जर फायदा झाला असता तर भाजपचे बोट धरून मागच्या दरवाजाने मनसेचा एक खासदार दिल्लीला गेला असता. जनतेने भाजप-मनसे युतीला झिडकारल्यानंतर राज ठाकरेंनी विधानसभेसाठी स्वबळाचा नारा दिला आहे. तो कितपत टिकतो याची खात्री नाही. सध्या राजकारणात कट-कारस्थानांचे स्तोम वरचेवर वाढत चालले आहे. ते पाहता सामान्य जनतेचा राजकारणावरील विश्वास उडत चालला आहे असे दिसते. विधानसभा निवडणुकीला काही महिन्यांचा कालावधी शिल्लक असल्याने सर्वच राजकीय पक्षांना निवडणुकीचे वेध लागले आहेत. सत्ता प्राप्त करणे हे अंतिम उद्दिष्ट आहे. त्या अनुषंगाने शह-काटशहाचे राजकारण खेळले जात आहे. युती असो की आघाडी, त्यांच्यासमोर जागा वाटप हा महत्त्वाचा विषय आहे. जास्तीत जास्त जागा आपल्या वाट्याला कशा येतील याकडे लक्ष दिले जात आहे. त्यात जिंकण्यासाठी लढवायच्या जागा आणि हरविण्यासाठी लढवायच्या जागा हा विषयही आहे. सर्व पक्ष योग्य उमेदवाराच्या शोधात आहेत. यात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने आघाडी घेतली आहे. त्यांनी विधानसभेसाठी दोन उमेदवारांची घोषणा केली आहे. राज ठाकरे यांनी मराठवाड्याच्या दौ-यावर येताना सोलापूर जिल्ह्याचा दौरा केला होता. सोलापूरच्या दौ-यात त्यांनी विधानसभा निवडणुकीसाठी दोन उमेदवार जाहीर केले. यावेळी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधताना आरक्षणाच्या मुद्यावर भाष्य केले. महाराष्ट्रात मराठा आणि ओबीसी आरक्षणाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या प्रश्नावरही त्यांनी मत व्यक्त केले. ते म्हणाले की, महाराष्ट्रात सगळ्या गोष्टी इतक्या मुबलक प्रमाणात आहेत की, इथे आरक्षणाची गरजच नाही. पैशाचे व्यवस्थित नियोजन केले तर महाराष्ट्राला आरक्षणाची गरजच नाही. महाराष्ट्र हे देशातील प्रगत सधन राज्य आहे. देशातील सर्वाधिक उद्योग, व्यवसाय महाराष्ट्रात आहेत. पायाभूत सुविधा, विकासाची कामे इथे मोठ्या प्रमाणात झालेली आहेत. सर्वच गोष्टी मुबलक प्रमाणात आहेत. त्यामुळे आरक्षणाची गरज नाही. परराज्यातून येणा-या लोंढ्यामुळे शहरांची लोकसंख्या वाढत आहे. मुंबई, ठाणे तसेच इतर शहरांमध्ये मोठे उड्डाणपूल झाले आहेत. या गोष्टी स्थानिक लोकांसाठी केल्या जात नाहीत तर बाहेरून येणा-या लोकांसाठी केल्या जात आहेत. आपल्या राज्यातील सर्वाधिक पैसा हा बाहेरून आलेल्या लोकांवर खर्च केला जात आहे. नसलेल्या सरकारी नोक-यांसाठी लोकांची माथी भडकवण्याचे काम केले जात आहे. मुळात नोक-याच शिल्लक नाहीत. त्यासाठी आरक्षणावरून लोकांमध्ये भांडणे लावली जात आहेत. राज्यातील उद्योग-व्यवसायातून निर्माण झालेल्या नोक-यांमध्ये मराठी माणसाला स्थान दिले जात नाही हे मूळ दुखणे आहे. मराठी माणसाला प्रथम प्राधान्य देण्यात आले तर आरक्षणाची गरज काय असा सवाल राज ठाकरे यांनी केला. आरक्षणातून किती नोक-या आणि उच्च शिक्षणाच्या संधी मिळाल्या हे तपासण्याची वेळ आली आहे असे सांगून राज ठाकरे म्हणाले, राजकारणी मंडळी लोकांच्या खांद्यावर आरक्षणाची बंदूक ठेवून राजकीय स्वार्थ साधत आहेत. हा सारा विष कालवण्याचा प्रकार असून त्याचे लोण थेट शाळा-महाविद्यालयापर्यंत पोहोचले आहे. आरक्षणाच्या प्रश्नावर महाराष्ट्रात मणिपूरसारखी परिस्थिती निर्माण होण्याची भीती शरद पवार यांनी व्यक्त केली होती. त्यावर भाष्य करताना राज ठाकरे म्हणाले, महाराष्ट्राचा मणिपूर होण्यासाठी शरद पवार यांनी हातभार लावू नये. आरक्षणासंबंधी राज ठाकरे यांनी मतप्रदर्शन केल्यानंतर त्याला प्रत्युत्तर मिळणार हे उघड होते. संघर्षयोद्धे मनोज जरांगे पाटील म्हणाले, राज ठाकरे यांना आरक्षणातील काही कळत नाही. त्यांना त्यांचे मित्र भडकवत आहेत. मराठ्यांना दोष देण्याचे काम तुम्ही करू नका. आरक्षणाविरुद्ध घेतलेली भूमिका राज ठाकरे यांनी कायम ठेवली तर विधानसभा निवडणुकीत मनसे उमेदवारावर दलित, आदिवासी, ओबीसी, बहुजनांनी बहिष्कार टाकावा असे आवाहन केंद्रीय मंत्री आणि आरपीआय पक्षाचे प्रमुख रामदास आठवले यांनी केले. राज ठाकरे यांच्या वक्तव्यामुळे नव्या वादाला तोंड फुटले आहे. 'तुम्ही खरेच प्रबोधनकार ठाकरे यांच्या घराण्यात जन्मलात का?' असा संतप्त सवाल ओबीसी आंदोलक लक्ष्मण हाके यांनी केला. प्रबोधनकारांच्या घरी जन्म घेऊन राज ठाकरे बेजबाबदार आणि असंवैधानिक वक्तव्य करीत आहेत याची कीव करावीशी वाटते असे हाके म्हणाले. राज ठाकरे यांच्या वक्तव्यावर धाराशिवमध्ये तीव्र प्रतिसाद उमटले. मराठा आरक्षणावर भूमिका स्पष्ट करा असा आग्रह धरत मराठा आंदोलकांनी ठाकरे यांच्या विरोधात सुमारे साडेतीन तास आंदोलन केले. जालना जिल्ह्यातील मंठा येथे राज ठाकरे आणि नारायण राणे यांच्या फोटोला जोडे मारून त्यांचे पुतळेही जाळण्यात आले. कोणत्याही वादाच्या निषेधार्थ फोटोला जोडे मारणे, पुतळा जाळणे हे प्रकार आता नित्याचे झाले आहेत. वाद हा संवादाद्वारेच मिटायला हवा.

# मनोज जरांगे पाटलांच्या आंदोलनात ॲड.राज पाटील यांचा सामाजिक महायज्ञ

## मराठा आंदोलनासोबतच गावोगावी वृक्ष लागवड करून निसर्ग संवर्धनाचे काम, मराठा आंदोलनात सक्रिय राहून आंदोलन यशस्वी करण्यासाठी धडपड, चार वर्षांपासून जरांगे पाटलाचे विचार तळागाळापर्यंत पोचविण्यासाठी अहोरात्र घेतली मेहनत

**वडवणी । प्रतिनिधी**

मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी उभा केलेला मराठा आरक्षणाचा लढा आज जागतिक पातळीवर जाऊन पोहोचला आहे. मात्र हा लढा सहजासजी उभा राहिला नाही. मनोज जरांगे पाटील यांनी मोठ्या जिद्द आणि मेहनतीतून हा लढा उभा केला आहे. ज्या पद्धतीने छत्रपती शिवरायांनी रायरेश्वराच्या मंदिरामध्ये मोजक्या मावळ्यांना सोबत घेऊन शपथ घेतली आणि ती पूर्ण करत स्वराज निर्माण केले. या पद्धतीने मनोज जरांगे पाटील यांनी जागतिक पातळीवर पोहोचविलेले हे मराठा आंदोलन अगदी छोट असताना या आंदोलनामध्ये सक्रिय राहून जरांगे पाटलांनी सर्व सामान्य कार्यकर्त्यांना सोबत घेऊन मोट बांधली. आणि आंदोलन यशस्वी केल. या आंदोलनामुळे आज कोट्यावधी मराठ्यांच्या जीवनामध्ये क्रांती घडून आली. या क्रांतीतून मराठ्यांच्या उज्वल भविष्याची वाट सापडली आहे. या पाटलाच्या आंदोलनामध्ये खारीचा वाटा उचलण्याचे काम वडवणी तालुक्यातील तीगावचे सुपुत्र ड. राज पाटील यांनी घेतलं. त्यांचा सार्थ अभिमान समस्त वडवणी तालुका आणि बीड जिल्ह्यातील नागरिकांना आहे. मनोज जरांगे पाटील हे मागील चार वर्षापासून जिथे जिथे आंदोलन करत होते. त्या आंदोलनाच्या ठिकाणी जाऊन केवळ आंदोलनाला पाठिंबा द्यायचा नाही अथवा आंदोलनात सहभागच दाखवायचा नाही तर त्या ठिकाणच्या लोकांना आंदोलनामध्ये सक्रिय करीत वृक्ष लागवडीचा संदेश देऊन झाड भेट देऊन पुस्तक भेट देत आहेत. आंदोलनात मोठी मेहनत घेणारे ड.राज पाटील यांनी महत्वाची

भूमिका पार पाडली. म्हणूनच मनोज जरांगे पाटील यांनी पाठीवर हात थोपटून ड.राज पाटील यांच मन भरून कौतुक केल.

मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांचं नेतृत्व सर्व सामान्य कार्यकर्त्यांच्या बळावर उभा राहिले आहे. गाव खेड्यातील गोरगरीब शेतकरी मराठ्यांचे लेकरं एकत्र करून माता मावल्यांच्या पाठबळावर जरांगे पाटलांनी हा लढा उभा केला आहे. मागील अनेक वर्षापासून मनोज जरांगे पाटील मराठ्यांचे आरक्षणाच्या लढ्यात अहोरात्र मेहनत घेत आहेत. मात्र मागील चार वर्षापासून जरांगे पाटलाच्या या आंदोलनाला एक वेगळच वळण मिळालं. सण २०१९ साली साष्टपिंपळगाव या ठिकाणी त्यांनी सुमारे १०९ दिवस आंदोलन केल. या कालावधीत त्यांनी उपोषण देखील केले. त्यावेळी शासनाने आश्वासन दिल्यामुळे त्यांनी उपोषण मागे घेतले होते. या आंदोलनाची धग देखील मोठ्या प्रमाणात पसरली होती. या आंदोलनापासून ड. राज पाटील जरांगे पाटलांच्या सोबत काम करत आहेत. साष्ट पिंपळगावच्या आंदोलनात जरांगे पाटलांसाठी १०९ दिवसांपैकी ६५ दिवस ड. राज पाटील यांनी त्या ठिकाणी हजेरी लावली होती. त्या आंदोलनामध्ये सक्रिय सहभाग घेऊन त्यांनी दररोज येणाऱ्या लोकांना झाडे आणि शिवरायांचे विचार सांगणारे पुस्तके वाटली. मनोज जरांगे पाटलांचं कार्य घराघरात पोहोचविण्यासाठी राज पाटलांनी बीड जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये जनजागृती केली. जरांगे पाटील यांच्यासोबत बीड जिल्ह्यातील अनेक कार्यकर्ते जोडण्याचं काम त्यावेळेसच राज पाटील यांनी केल होत. त्यानंतर जरांगे पाटलांनी भांबेरी, वडीकाळा या ठिकाणी केलेल्या आंदोलनातही राज पाटील सक्रिय राहिले. आणि आंतरवाली सराटीमधील आंदोलनामध्ये देखील राज पाटलांचे काम दिवस रात्र त्या ठिकाणी पाहायला मिळाल. कधीच समोर न येता जरांगे पाटलांच्या आदेशाचे पालन करून आंदोलन यशस्वी करण्यासाठी राज पाटील यांनी वेळोवेळी सहकार्य केल. मनोज जरांगे पाटील हे मराठ्यांच्या लेकरांसाठी अहोरात्र मेहनत घेत आहेत. जरांगे पाटील यांच्यामुळे मराठ्यांच्या लेकरांना न्याय मिळणार आहे. जरांगे पाटलाचे विचार त्यांनी तळागाळापर्यंत पोहोचण्यासाठी गावोगावी बैठका घेऊन जनजागृती केली. ज्या ज्या वेळी जरांगे पाटलांनी आदेश दिला त्यावेळी अनेक गावात उपोषणाची सुरुवात ड.राज पाटील यांनी केली. आंदोलन, साखळी उपोषण यासारखे आंदोलने त्यांनी गावोगावी सुरू केली. आणि जरांगे पाटलावर एकनिष्ठ राहून त्यांनी सर्वसामान्य मराठ्यांच्या लेकरांमध्ये आंदोलनाची धग पोहोचविली. हे करत असताना जरांगे पाटलांच्या विचाराला कुठेही तडा जाणार नाही याची काळजी देखील राज पाटील यांनी घेतली. सध्याही राज पाटील प्रसिद्धीपासून बाजूला राहत असले तरी जरांगे पाटलाचे विचार घराघरापर्यंत पोचण्याचे काम करत आहेत. आता झालेल्या रक्तदान शिबिरामध्ये त्यांनी गावोगावी फिरून मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड केली. वृक्ष वाटले, पुस्तके वाटली आणि अनेक लोकांना रक्तदानाचे महत्त्व पटवून दिल. यावेळी त्यांनी ४९ वे रक्तदान केलं. ड. राज पाटील यांच्या कामाचं समस्त मराठा समाजाकडून कौतुक होत आहे. मराठा योद्धा मनोज जरांगे पाटिल यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने ड. राज पाटील यांच्या कार्यावर साप्ताहिक गदर चा विशेष आढावा. आणी माजलगाव मतदारसंघातून उमेदवारी देण्याची मागणी केली.

### समाजकारणासाठी राजकारण सोडले...

ॲड. राज पाटील हे या अगोदर राजकीय पक्षांमध्ये काम करत होते. मात्र मराठा आंदोलन मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली सुरू झाल्यापासून त्यांनी राजकारणाला रामराम ठोकला. आपल्याला राजकारण महत्त्वाचं नाही तर समाजकारण महत्त्वाचं आहे. जे समाजकारण आपलं आहे. समाजाचे दैवत असणारे मनोज जरंगे पाटील करत आहेत. मराठ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी गोरगरीब लोकांना हक्काचं आरक्षण मिळवून देण्यासाठी जरांगे पाटलांनी घेतलेली भूमिका ही सर्वात मोठी भूमिका आहे. आणि या भूमिकेच्या पाठीमागे आम्ही खंबीर उभे आहोत अशी भूमिका राज पाटील यांनी घेत राजकारणाला राम राम ठोकला आहे.

### हजारो विद्यार्थ्यांना मदतीचा हात

ॲड.राज पाटील यांचे सामाजिक कार्य मागील अनेक वर्षापासून सुरू आहे. त्यांनी कोरोनाच्या महामारी मध्ये वडवणी तालुक्यातील सुमारे बारा हजार विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप केलं होतं. गोरगरीब लोकांना किराणा आणि अन्नधान्य वाटप करण्याचे कामही राज पाटील यांनी केल होत. गोरगरीब मुलांच्या फीस भरण्याचं काम ते आजही करतात. एमबीबीएसला लागलेल्या मुलांचं शिक्षणाचा खर्च देखील राज पाटील यांनी केला. त्यांच्यामुळे आतापर्यंत अनेक विद्यार्थी स्वतःच्या पायावर उभे राहिले आहेत.

### तीगावचा केला कायापालट

ॲड.राज पाटील यांच्या पत्नी सौ. अर्चणा पाटील या वडवणी तालुक्यातील तीगाव या गावच्या सरपंच आहेत. त्यांनी सरपंचाच्या माध्यमातून तीगाव शिवारातील शेती पोहोच रस्ते सुमारे १७ किलोमीटर आंतर चे रस्ते स्वतःच्या स्वखर्चाने केले आहेत. या रस्त्यामुळे तीगाव शिवारातील सर्व शेतकऱ्यांची मोठी सोय झाली आहे. राज पाटील सारखा सरपंच गावाला मिळाल्यामुळे आम्ही भाग्यवान आहोत असे गावकऱ्यांकडून बोलले जात आहे.

# नालंदा फाउंडेशन बीड यांच्या वतीने कवी प्रो.डॉ.संजय मोहड यांना महाकवी वामनदादा कर्डक राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

**बीड । प्रतिनिधी**

**महाकवी वामनदादा कर्डक यांच्या जयंतीनिमित्त नालंदा फाउंडेशन बीड यांच्या वतीने प्रतिवर्षी दिला जाणारा महाकवी वामनदादा कर्डक राज्यस्तरीय पुरस्कार डॉ.संजय मोहड प्रोफेसर आणि संगीत विभाग प्रमुख, स.भु. कला व वाणिज्य महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना जाहीर करण्यात आला असल्याची माहिती संयोजन समितीच्या वतीने देण्यात आली आहे.**

नालंदा फाउंडेशन बीड यांच्या वतीने सामाजिक क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या व्यक्तींना त्यांनी दिलेल्या योगदानाबद्दल दरवर्षी महाकवी वामनदादा कर्डक राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. यावर्षीचे मानकरी प्रो.डॉ.संजय मोहड हे आहेत. त्यांनी दिलेल्या योगदानाबद्दल त्यांचा यथोचित सत्कार नालंदा फाउंडेशन बीड यांच्या वतीने करण्यात येणार आहे.या पुरस्काराचे स्वरूप २५ हजार रुपयांचा धनादेश, स्मृति चिन्ह, सन्मानपत्र असे आहे. प्रो.डॉ.संजय मोहड यांनी फुले- शाहू- आंबेडकर विचारांची पेरणी करत आपल्या साहित्याच्या माध्यमातून त्यांची विचारधारा जनमानसात पोचवण्याचे कार्य केले आहे. त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत नालंदा फाउंडेशन बीड यांच्या वतीने १५ ऑगस्ट २०२४ रोजी सायंकाळी ६ वाजता यशवंतराव चव्हाण नाट्यगृह बीड येथे नालंदा फाऊंडेशनचे अध्यक्ष प्रा.प्रदिप रोडे यांच्या हस्ते महाकवी वामनदादा कर्डक राज्यस्तरीय पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात येणार आहे. अशी माहिती संयोजन समितीच्या वतीने देण्यात आली आहे.

# गेवराई तालुक्यातील मावळ्यांनी बेमुदत धरणे आंदोलनात सहभागी व्हावे - कैलासराव माने

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई शहरातील छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समिती ने उद्या दि.९ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय समोर बेमुदत धरणे आंदोलनाचा इशारा दिला आहे.दोन वर्षा पासून समिती गेवराई शहरात स्मारक व्हावे यासाठी प्रयत्नशील आहे.मा.मुख्यमंत्री एकनाथराव जी शिंदे साहेब यांनी आदेश देवूनही कायदेशीर सबब दाखवून जिल्हा प्रशासन स्मारक उभारण्यासाठी परवानगी देण्यात साठी टाळाटाळ करीत असल्याने समिती ने जिल्हाधिकारी कार्यालय समोर बेमुदत धरणे आंदोलनाचा निर्णय घेतला आहे.तरी आंदोलनात सहभागी व्हावे असे आवाहन छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समिती चे सचिव कैलासराव माने यांनी केले आहे.

## पान १ वरून....

### अण्णाभाऊ साठे केवळ साहित्यिकच नव्हते ते

असताना त्यांना स्वातंत्र्य सैनिकाचे पेन्शन मिळू शकले नाही संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतही त्यांनी सहभाग घेतला होता. त्यांच्या लाल बावटा कला पथकाचे संयुक्त महाराष्ट्र चळवळीत मोलाचे योगदान आहे. याप्रसंगी माऊली शिरसाठ यांनी प्रस्ताविक केले सरपंच दत्ताभाऊ खेडकर हे अध्यक्षस्थानी होते.

---

### भाई थावरेंनी घेतली

मतदारसंघातील शेतकरी, निराधारांच्या प्रश्नासाठी झागडत आहेत. विविध आंदोलने, मोर्चा काढून थावरे यांनी पीक विमा,पीएम किसान योजना आदी शेतकऱ्यांच्या योजनांचा लाभ शेतकऱ्यांना मिळवून दिला आहे. चाळीस वर्षांपासून प्रामाणिकपणे जनसेवेच्या माध्यमातून भाई थावरे लढत आहेत. जिल्हा परिषद सदस्य असताना थावरे यांनी लोकपयोगी कामे केली आहेत.त्यांनी माजलगाव मतदारसंघात आमदार प्रकाश सोळंके यांच्या विरोधात निवडणूकही लढविली आहे. दरम्यान भाई थावरे गेल्या काही वर्षांपासून शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सक्रीय काम करत आहेत. आजही शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आक्रमक भूमिका घेत लढत आहेत. यामुळे त्यांना माजलगाव मतदारसंघामध्ये मानणारा मोठा वर्ग असून आगामी विधानसभा निवडणुकीत माजलगाव मतदारसंघाातून निवडणूक लढविण्यास ते इच्छुक आहेत. दरम्यान गुरुवारी भाई थावरे यांनी दिल्ली येथे शरद पवार यांची भेट घेऊन आपल्या कार्याचा अहवाल त्यांनी पवारांकडे सादर केला आहे आर्दीनी केले आहे.

---

### बाजार समितीची जमीन

मुद्दल १कोटी ३० लाख व त्यावर वरील व्याज २कोटी झालेले असून असे एकूण ३ कोटी ३० लाख रुपये बाजार समितीकडे देने असून कृषी पणन मंडळाने ओ. टी. एस.योजनेद्वारे ५०% व्याज सवलत मिळणार आहे सदरील योजनेचा लाभ घेण्यासाठी बाजार समितीकडे एवढी मोठी रक्कम शिल्लक नसल्याने सदरील जमीन विक्री करण्याचा निर्णय घेतला आहे ही जमीन गुरांचा बाजार भरवण्यासाठी तात्कालीन सभापती कै. दादासाहेब रांजवण यांनी खरेदी केली होती परंतु सदरील जमीन ही आऊट साईट ला असल्याने त्याठिकाणी गुरांचा बाजार भरला नाही तसेच याठिकाणी बाजार समितीने फळे भाजीपाला इ.मार्केट सुरू करण्याचा प्रयत्न केला होता परंतु त्यास प्रतिसाद न मिळाल्याने सदरील जागा अविकसित राहिल्याने त्या जमिनी पासून कोणतेही उत्पन्न मिळालेले नाही विक्रीतून येणाऱ्या रकमेतून एक रकमी कर्ज भरून बाजार समिती कर्जमुक्त होणार आहे व यानंतर बाजार समिती आवारात अद्यावत गोदाम व धान्य वाळवण्यासाठी मोठे ओटे,व सेल हॉल (शेड)उभारण्यात येणार आहे. अशी माहिती या प्रसिद्धी पत्रकात सभापती जयदत्त नरवडे उपसभापती श्रीहरी मोरे सचिव हरिभाऊ सवने यांनी दिली आहे.

---

### शेतकऱ्यांचे अनुदान तत्काळ

केलेले अनुदान तत्काळ जमा करावे या मागणीसाठी बीड जिल्हा मधील शेतकऱ्याच्या वतीने शेतकरी आक्रोश मोर्चा काढण्यात आला आहे हा मोर्चा छत्रपती शिवाजी महाराज चौक ते जिल्हाधिकारी कार्यालय येथे होणार आहे या शेतकरी आक्रोश मोर्चा साठी शिवसंग्राम शेतकरी आघाडीचा जाहीर पाठिंबा देण्यात येत आहे जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन शिवसंग्राम शेतकरी जिल्हाध्यक्ष राजेंद्र आमटे यांच्या वतीने करण्यात येत आहे .

---

### राज ठाकरे आज जिल्हा

आढावा घेणार आहेत. सायंकाळी मनसेच्या संपर्क कार्यालयाचे उदघाटन ठाकरे यांच्या हस्ते होणार असून ते बीड येथे मुक्कामी राहणार आहेत. शनिवारी (दि.१०) सकाळी ते जालन्याकडे रवाना होतील, अशी माहिती मनसे जिल्हाध्यक्ष सुमंत धस, राजेंद्र मोटे, श्रीराम बादाडे, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा वर्षा जगदाळे यांनी दिली.

---

### ज्येष्ठ नागरिकांसाठी गेवराईत विशेष

तपासणी उपजिल्हा रुग्णालयात निःशुल्क करण्यात येणार आहे . या अनुषंगाने गेवराई शहर व तालुक्यातील ज्येष्ठ नागरिकांनी आपले विविध आजाराचे रिपोर्ट सोबत घेऊन १६ ऑगस्ट रोजी रुग्णालयात सकाळी ९ .३० वाजता हजर राहावे आणि या तपासणी शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन जेष्ठ नागरिक तालुका समन्वय समितीचे अध्यक्ष प्रा. राजेंद्र बरकसे ,सचिव सखाराम कानगुडे, सदस्य एस.पी. सूर्यवंशी,श्रीमती शोभाताई चेडे, श्रीमती सीता महासाहेब, प्रा. संदीपान हिंगे, लक्ष्मणराव घाडगे आर्दीनी केले

---

### शासकीय व निमशासकीय तसेच खाजगी संस्थेत

भालेकर (जिल्हा कार्यक्रम समन्वयक, एनसीडी), श्री. विशाल जाधव (एफएलसी, जि.रु.बीड) श्री. नागनाथ भडकुंबे (मानसशास्त्रज्ञ), श्री. सुरेश दामोधर (सामाजीक कार्यकर्ता), श्री. श्रीकांत उजगरे (दंत आरोग्य तज्ञ गि.रु. बीड) श्री. अविनाश महालींगे (प्रयोगशाळा तंत्रज्ञ) श्री. तत्वशील कांबळे (जेष्ठ सामाजीक कार्यकर्ता) उपस्थीत होते.

---


## जाहीर प्रगटन

**मा. एम.आर. बडाख, ९ वे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज ११३७/२०२४**

**शोभा विरूध्द निरंक नि.७ सी.**

**अर्जदारः १. शोभा भाउसिंग मोधारे वय ४७ वर्षे, धंदा रा. मोची गल्ली, बीड ता.जि. बीड. घरकाम, २. राहुल भाउसिंग मोहारे वय २९ वर्षे, धंदा ग. मोची गल्ली, बीड ता. जि.बीड मजुरी, ३. रोहित भाउसिंग मोहारे वय २५ वर्षे, धंदा मजुरी, रा. मोची गल्ली, बौड ता. जि. बीड. ४. कोमल दिपक कोतवाल, वय २७ वर्षे, बंदा घरकाम, रा. पांगुळमळी, गणेश पेठ, पुणे ता. पुणे जि. बीड**

**मागणी**-बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत...

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत भाउसिंग हेमराज मोहारे य. मोची गल्ली, बौड ता.जि. बीड यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी भाउसिंग हेमराज मोहारे यांचा मृत्यु दि.०८.०७.२०२२ रोजी मोची गल्ली, बीड ता.जि. बीड येथे मृत्यु झाला असुन अर्जदार क. १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क. २ व ३ हे मयताचे मुले आहेत व अर्जदार क. ४ ही मयताची विवाहीत मुलगी आहे, अर्जदार क १ ते ४ यांच्या शिवाय मयत यांना इतर कोणीही अन्य जवळचे कायदेशीर वारस नाहीत. मयत भाउसिंग हेमराज मोद्वारे यांचे निधन झाले आहे. मयत्ताचे पश्चात शासकीय व निमशासकीय कार्यालयीन उपयोगाकरीता बारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे .त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयत्ताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याने आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरह मयत भाउसिंग हेमराज मोहारे याचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०७ जुलै २०२४ रोजी माझे सहीने व न्यायालयायचे शिक्काने दिले .

सदर प्रकरणाची पुढीले तारीख दि.१८/०९/२०२४ आहे.

**स्वाक्षरीत/-**
**कनिष्ठ लिपीक**
९ वे सह.दि.न्या.का.
स्तर. बीड.

कोर्टाचा शिक्का

**अदिशावरून,**
**स्वाक्षरीत/-**
**अदिक्षक**
**दिवाणी न्यायालय.व. स्तर. बौड**

# अनुदानाचा वाढीव टप्पा आणि जुनी पेन्शनच्या मागणीसाठी मुख्याध्यापकांचे जिल्हाधिकारी कार्यालया समोर धरणे आंदोलन

**बीड। प्रतिनिधी**

**राज्यातील सर्व अशंतः अनुदानीत, विनाअनुदानीत शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना अनुदानाचा वाढीव टप्प्याचा तातडीने शासनादेश काढून किमान एका महिन्याचा तरी पगार सर्व शिक्षकांच्या खात्यावर द्यावा, राज्यातील सर्व कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी या प्रमुख मागण्यासह अन्य मागण्यासाठी बीड जिल्हा मुख्याध्यापक संघाच्या वतीने जिल्हाध्यक्ष जालिंदर पैठणे सर आणि रसाळ सर यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालया समोर दुपारी ३ ते ६ या वेळेत धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी जिल्ह्यातील बहुतांश शाळेचे मुख्याध्यापक उपस्थित होते.**

महाराष्ट्र राज्यातील प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक अशंतः अनुदानीत, विनाअनुदानीत शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना अनुदानाचा वाढीव टप्प्याचा तातडीने शासनादेश काढून किमान एका महिन्याचा तरी पगार सर्व शिक्षकांच्या खात्यावर जमा करावा तसेच राज्यातील सर्व कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी या प्रमुख मागण्यासह शाळांतील विविध शैक्षणिक समस्या संदर्भात बीड जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक मुख्याध्यापक संघाच्या वतीने जिल्हाध्यक्ष जालिंदर पैठणे सर आणि सचिव विष्णुपंत रसाळ सर यांच्या नेतृत्वाखाली आज मंगळवार दिनांक ०६ ऑगस्ट २०२४ रोजी धरणे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात मुख्याध्यापक संघाच्या पदाधिकाऱ्यांनी मनोगत व्यक्त करताना शिक्षणाबाबत सरकारची किती उदासिनता आहे. याबाबत उहापोह करण्यात आला. यावेळी अनेक मुख्याध्यापकांनी सरकारच्या या उदासिनत धोरणा बाबत तीव्र संताप व्यक्त

करण्यात आला. त्यानंतर आपल्या न्याय्य आणि रास्त मागण्या मान्य करण्यासंदर्भात घोषणा दिल्या. या घोषणांनी जिल्हाधिकारी कार्यालय आणि परिसर दणाणून गेला. त्या नंतर शिष्टमंडळानेशिष्टमंडळाने आपल्या मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी यांच्या मार्फत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांना आणि शिक्षण सचिवांना देण्यात आले. या निवेदनाद्वारे प्रचलीत धोरणानुसार अनुदान टप्पा तात्काळ लागू करावा,१ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त व १ नोव्हेंबर २००५ नंतर अनुदानावर आलेल्या माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना जुनी पेंशन योजना लागू करावी, १५ मार्च २०२४ चा सुधारीत संच मान्यता शासन निर्णय रद्द करुन शाळा तेथे मुख्याध्यापक पद हे धोरण असावे,१५ मार्च २०२४ वर्ग ५ वी व ८ वी च्या वर्गाचा दर्जावाढ निर्णय तात्काळ रद्द करावा, शिक्षक कर्मचारी भरती तात्काळ करावी, राज्यातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना कॅशलेस मेडिकल योजना तात्काळ लागू करावी, ०१ नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्त शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना जुनी पेंशन योजना लागु करावी या मागण्यांचे निवेदन देण्यात आले. या आंदोलनात मुख्याध्यापक संघाचे जिल्हाध्यक्ष पैठणे सर, सचिव विष्णुपंत रसाळ सर, संस्था प्रतिनिधी संघटने प्रतिनिधी सुशीलाताई मोराळे मॅडम, जितेंद्र डोंगरे सर, मराठवाडा शिक्षक संघाचे राजकुमार कदम सर, डी. जी. तांदळे सर, जिल्हाध्यक्ष कालिदास धपाटे सर, गणेश आजबे सर, शिक्षकेतर संघटनेचे श्री कळबंकर सर, युक्रांचे पंडित तुपे सर, डिंगांबर पांचाळ सर, लक्ष्मण इंगोले सर, अनिल काळे सर, प्रदीप गाडे सर, गणेश घोडके सर, रमेश बागलाने सर, सुशीलकुमार गायकवाड सर, कानडे सर, भीमराव सावंत सर, रामहरी कदम सर, सुराज्य शिक्षक संघटनेचे पदाधिकारी दत्तात्रय चव्हाण सर, काजळे सर, विनाअनुदानित शाळा कृती समितीचे जिल्हाध्यक्ष आत्माराम वाव्हळ सर, भागवत यादव सर, सुरेश कदम सर, प्रकाश कदम सर, गणेश गुजर, सय्यद सर, पि के कदम सर, एम पी शिरसाट सर, पांचाळ सर, सावंत सर, फपाळ सर, डोंगरदिवे सर, हाके सर, गरड सर, मेहेत्रे सर, वक्ते सर, मंदे सर, शर्मा सर, यांच्यासह विविध शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते

## गणेश शेंडगे यांना महाराष्ट्र शासनाचा राज्यस्तरीय ग्रंथमित्र पुरस्कार जाहीर

**बीड । प्रतिनिधी**

**येथील ए.एच.वाडिया वाचनालयाचे ग्रंथपाल गणेश रामभाऊ शेंडगे यांना महाराष्ट्र शासनाचा राज्यस्तरीय ग्रंथमित्र पुरस्कार जाहीर झाला आहे.**

महाराष्ट्र शासनाच्या वतीने दरवर्षी उत्कृष्ट ग्रंथालय, उत्कृष्ट कार्यकर्ता व उत्कृष्ट ग्रंथालय सेवक (ग्रंथमित्र) पुरस्कार दिले जातात.सन २०२२-२३ या वर्षासाठीच्या पुरस्कारांची नुकतीच घोषणा करण्यात आली.त्यात छत्रपती संभाजी नगर विभागातून बीड येथील ए.एच.वाडिया वाचनालयाचे ग्रंथपाल गणेश शेंडगे यांना डॉ.एस.आर.रंगनाथन यांच्या नावाने दिला जाणारा उत्कृष्ट ग्रंथालय सेवक (ग्रंथमित्र) पुरस्कार जाहीर झाला आहे.रोख २५००० हजार रुपये, स्मृती चिन्ह व प्रमाणपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे.लवकरच मुंबई येथे मान्यवरांच्या उपस्थितीत हा पुरस्कार वितरण सोहळा संपन्न होणार आहे. या पुरस्काराबद्दल ग्रंथालय संचालक महाराष्ट्र राज्य मुंबई, सहाय्यक ग्रंथालय संचालक छत्रपती संभाजी नगर, बीड जिल्हा ग्रंथालय अधिकारी, ए.एच.वाडिया सार्वजनिक ग्रंथालयाचे विश्वस्त व कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी, ग्रंथालय क्षेत्रातील विविध पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रंथालय सेवक, मित्र मंडळ,आप्त स्वकीय अशा सर्वच हितचिंतकांनी हार्दिक अभिनंदन केले आहे.

## केज तालुक्यातील विहीरी व गायगोठा रक्कम जमा करा !

### ● अन्यथा के.पं.स.समोर आत्मदहन करणार-रोहन गलांडे पाटील

**केज । प्रतीनिधी**

केज तालुक्यातील प्रेत्येक ग्रामपंचायत अंतर्गत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना म्हणजेच मनरेगाच्या माध्यमातून खोदलेल्या शेतकऱ्यांचे वयक्तीक लाभार्थ्यांचे सिंचन विहीर खोदण्यासाठीचे ४ लाख रुपये अनुदान व गायगोटा योजनेचे ७८ हजार अशा दोन्ही योजनेचे शासनाकडून निधी मागवून लवकरात लवकर लाभार्थी यांना रक्कम मिळावी व तात्काळ शासनाने द्यावी जर तात्काळ रक्कम देण्यात आली नाही तर केज पंचायत समिती समोर आत्मदहन करणार आहे असा इशारा शासनाला निवेदनाद्वारे अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघ महाराष्ट्र राज्य केज तालुकाध्यक्ष रोहन गलांडे पाटील यांनी दीला आहे या विषयी निवेदनाद्वारे सविस्तर वृत्त असे की महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना म्हणजेच मनरेगाच्या माध्यमातून केज तालुक्यातील लाभार्थी शेतकऱ्यांचे वयक्तीक लाभार्थ्यांचे

शासन कागदोपत्री प्रक्रिया ज्या लाभार्थांची पुर्ण झाली आहे व केज तालुक्यातील ग्रामपंचायत अंतर्गत ज्या लाभार्थ्यांनी मनरेगा जलसिंचन विहीर योजनेचे लाभार्थी आहेत लाभार्थांन कडील शासन प्रक्रिया पूर्ण झालेली आहे परंतु अद्याप पर्यंत लाभार्थ्यांना मनरेगा योजने अंतर्गत झालेल्या विहीरीचा ऐकही रुपये रक्कम देण्यात आलेली नाही चार - पाच महिने झाले केज तालुक्यातील विहीर लाभार्थी शेतकरी मनरेगा विहीर योजने अंतर्गत ४ लाख अनुदान मिळणार म्हणून व्याजाचे पैसे काढून विहीरीला खर्च करून विहीर खोदल्या आहेत परंतु शासना कडुन महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत खोदलेल्या विहीरीची ४ लाख रुपये रक्कमेतील ऐक रुपये शेतकऱ्यांच्या , लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यात आलेला नाही तरी शासनाने केज तालुक्यातील प्रेत्येक ग्रामपंचायत अंतर्गत झालेल्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत खोदलेल्या विहीरीचे ४ लाख अनुदान व गायगोठा योजनेचे ७८ हजार शासनाकडून निधी मागवून लवकरात लवकर लाभार्थी यांना रक्कम मिळावी,अनुदान शासन कागदोपत्री प्रीक्रीया तात्काळ पुर्ण करुन लाभार्थ्यांच्या बँक खात्यात तात्काळ जमा करावे अन्यथा अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघ केज तालुकाध्यक्ष रोहन गलांडे पाटील केज पंचायत समिती समोर आत्मदहन करण्याचा शासनाला इशारा रोहन गलांडे यांनी निवेदनाद्वारे दीला आहे.

## मुप्टा शिक्षक संघटनेच्या बीड जिल्हाध्यक्षपदी शरद मगर

**बीड । प्रतिनिधी**

मुप्टा शिक्षक संघटनेची महत्त्वपूर्ण बैठक मुप्टाचे संस्थापक सचिव नेते प्रा. सुनील मगरे यांच्या अध्यक्षतेखाली रविवार दिनांक ४ ऑगस्ट रोजी सिद्धार्थ महाविद्यालय मिटमिटा छत्रपती संभाजी नगर येथे संपन्न झाली. या बैठकीमध्ये प्रा. सुनील मगरे यांनी संघटने मधील विविध जिल्ह्यातील पदाधिकारी यांचे फेरबदल केले. संघटना बांधणी, शिक्षक प्राध्यापक यांच्या विविध प्रश्न,आंदोलनासंबंधी चर्चा ,संघटनेचे सातवे अधिवेशन यावर सविस्तर मार्गदर्शन केले. मुप्टा शिक्षक संघटनेच्या विभागीय कार्याध्यक्षपदी प्रा.प्रदीप रोडे व डॉ. भास्कर टेकाळे यांची नियुक्ती करण्यात आली. बीड जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष म्हणून जिल्हाध्यक्षपदी शरदराव मगर यांची निवड करण्यात आली. जिल्हा सचिव पदी प्रा.शशिकांत जावळे व कार्याध्यक्षपदी भैयासाहेब आदोडे यांची नियुक्ती करण्यात आली. यावेळी संघटनेचे नेते सुनील मगरे, डॉ.समीउल्ला खान डॉ. भास्कर टेकाळे यांच्या हस्ते नूतन पदाधिकारी यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी संघटनेचे पदाधिकारी राजेंद्र जाधव शेख मुनीर शिवराम मस्के पद्माकर कांबळे सुनील पांडे यांची उपस्थिती होती महाराष्ट्रातून संघटनेचे प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. बीड जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष मा. शरदराव मगर यांच्या निवडीबद्दल सर्व स्तरातून शुभेच्छा व कौतुक होत आहे.

## मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेची ई-केवायसी करण्यासाठी पैसे देऊ नये - नाजीम शेख

**आष्टी। प्रतिनिधी**

**राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी नुकत्याच झालेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना सुरू केली आहे.ज्यामध्ये पाच जणांच्या कुटुंबाला दरवर्षी तीन मोफत गॅस सिलिंडर मिळणार आहेत.केंद्र सरकारच्या पंतप्रधान उज्वला योजनेचा आणि मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ घेणाऱ्या महाराष्ट्रातील लाभार्थ्यांना अन्नपूर्णा योजनेचा लाभ घेता येणार आहे.यासाठी जवळील गॅस एजन्सी कार्यालयात जाऊन ई-केवायसी करणे आवश्यक आहे. ई- केवायसी प्रक्रिया पूर्णपणे मोफत असून यासाठी कोणी पैशाची मागणी करत असेल तर देऊ नये असे आवाहन नगरसेवक नाजीम शेख यांनी केले आहे.**

नुकत्याच झालेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी विविध योजनांची घोषणा करून त्यावर अंमलबजावणी करण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या आहेत.विशेषतः महिलांसाठी जास्तीच्या योजना राबवण्याचा संकल्प महाराष्ट्र सरकारने केला आहे.यामध्ये मुख्यमंत्री लाडकी बहीण, मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना यासह इतर योजनांचा समावेश आहे. मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेचा राज्यातील ५२ लाख १६ हजार ४१२ कुटुंबाला लाभ मिळणार आहे.वर्षाला तीन गॅस सिलेंडर मोफत मिळणाऱ्या योजनेसाठी ई-केवायसी करणे आवश्यक आहे.हि प्रक्रिया पूर्णपणे मोफत असून त्यासाठी कोणालाही पैसे देण्याची गरज नाही. जर कोणी पैश्याची मागणी करत असेल त्याची तक्रार करावी व त्याला पैसे देऊ नये असे आवाहन अजित पवार गटाचे नगरसेवक नाजीम शेख यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.

## मुप्टा बीड जिल्हाध्यक्ष शरद मगर यांच्या निवडीबद्दल सत्कार

**बीड । प्रतिनिधी**

मुप्टा शिक्षक संघटनेचे नवनियुक्त बीड जिल्हाध्यक्ष शरद मगर यांचा सत्कार बीड शहरातील नीलकमल हॉटेलमध्ये संपन्न झाला. या सत्काराचे आयोजन प्रा.बाळासाहेब गव्हाणे यांनी केले होते. या सत्कार प्रसंगी मुप्टा शिक्षक संघटनेचे जूनियर विभागाचे जिल्हाध्यक्ष प्रा.शशिकांत जावळे, मुप्टाचे विभागीय कार्याध्यक्ष (जूनियर विभागाचे) प्रा.बाळासाहेब गव्हाणे, बहुजन टीचर्स असोसिएशनचे जिल्हा सरचिटणीस महादेव इनकर प्रशांत वासनिक, क्रांतिकारी शिक्षक संघटनेचे प्रा.डॉ.शशिकांत गायकवाड , मुप्टाचे पाटोदा तालुकाध्यक्ष जयराम यादव आदी उपस्थित होते.

## १५ हजाराच्या लाच प्रकरणी लाईनमन आरोपीचा अटकपूर्व जामीन अर्ज नामंजूर-ॲड.शेख ईमरान

**बीड । प्रतिनिधी**

**तालुक्यातील मंजेरी फाटा येथे लाईनमनने एका हॉटेल व्यावसायिकाला लाच घेण्यासाठी सांगितले असता लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने हॉटेल व्यावसायिकाला रंगेहाथ लाच घेतांना पकडून कारवाई केली होती. या प्रकरणातील आरोपी लाईनमनने अटकपुर्व जामीनसाठी अर्ज केला असता तो अर्ज मा.न्यायालयाने नामंजूर केला आहे.**

याबाबत सविस्तर माहिती अशी की, श्रीमंत जीवराज मुंडे या महावितरण लाईनमनने नवीन मीटर बसविण्याकरीता तक्रारदार यांच्याकडे २० हजाराची लाच मागितली होती तडजोडीअंती १५ हजार रुपये निश्चित करण्यात आले होते. खासगी व्यक्ती हॉटेलचालक याच्याकडे सदर रक्कम देण्याचे लाईनमन याने सांगितले त्यानुसार तक्रारदाराने हॉटेलचालकाकडे मंजेरी फाटा पाली येथे १५ हजार रुपयाची लाच दिली होती. सदरची लाच स्विकारताना हॉटेल चालकाला रंगेहाथ लाचलुचत विभागाकडून पकडण्यात आले होते. त्यातील दुसरा आरोपी लाईनमन श्रीमंत मुंडे हा फरार होता त्याने अटकपुर्व जामीनासाठी मा. सत्र न्यायालय, बीड येथे अर्ज केला होता सदर जामीन अर्जात फिर्यादी /तक्रारदार याने ॲड.शेख ईमरान खाजा यांच्या मार्फत जामीनीस आक्षेप घेत मा.न्यायालयासमोर कायदेशीर बाबी निदर्शनास आणून देत मुख्य आरोपीचा जामीन अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली या कायदेशीर बाबी ग्राह्य धरुन मा.न्यायालयाने आरोपीचा अटकपुर्व जामीन अर्ज नामंजूर केला. यावेळी फिर्यादीच्या बाजूने ॲड.शेख ईमरान खाजा यांनी बाजू मांडली त्यांना ॲड.पंकज रायभोळे, ॲड.अन्वर शेख, ॲड.सुर्यकांत पवार यांनी सहकार्य केले.

## बीडला आनंदऋषी डायग्नोस्टीक सेंटरमध्ये रविवारी कॅन्सर शिबिर

### डॉ.अनिकेत शिंदे करणार रुग्ण तपासणी

**बीड । प्रतिनिधी**

**शहरातील जालना रोडवरील आनंद ऋषीची डायग्नोस्टिक सेंटर येथे आजपर्यंत विविध मोफत शिबिरांचे आयोजन करत हजारो रुग्णांना लाभ मिळवून देण्यात आला आहे. अनेक रुग्णांवर अल्पदरात नेत्र शस्त्रक्रिया आणि चष्म्याचे वाटप आनंदऋषीजी हॉस्पिटल अहिल्यानगर यांच्याकडून करण्यात आले आहे. मागील तीन वर्षात बीड येथील आनंदऋषीजी डायनोस्टिक सेंटरच्या माध्यमातून सर्वसामान्य, गोरगरीब गरजू रुग्णांना मोठा आधार देण्याचे काम अविरतपणे सुरू झाले आहे. याच आनंदऋषीजी डायग्नोस्टिक सेंटरमध्ये रुग्णांचा मिळणारा मोठा प्रतिसाद लक्षात घेऊन येत्या रविवार दि. ११ ऑगस्ट २०२४ रोजी कॅन्सर रुग्णांसाठी सुप्रसिद्ध कॅन्सर तज्ञांच्या माध्यमातून तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले आहे.नावनोंदणीसाठी मोबाईल क्र. ८२६२००९०९१ येथे संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.**

शहरातील जालना रोडवरील छत्रपती शाहू बँकेजवळील आनंदऋषीजी डायग्नोस्टिक सेंटर येथे दि.११ ऑगस्ट २०२४, रविवार रोजी सकाळी ११ ते दुपारी ४ वाजे पर्यंत प्रसिद्ध कॅन्सर सर्जन डॉ.अनिकेत शिंदे यांच्या मार्गदर्शनात हे कॅन्सर शिबिर आयोजित करण्यात आले आहे.या कॅन्सर शिबिरात तोंड, स्तन, फुफ्फुस, आतडी,लिव्हर, स्वादुपिंड आणि गर्भाशयाच्या कॅन्सरसह इतर अवयवांच्या कॅन्सरची तपासणी केली जाणार आहे. रुग्णांना या तपासणी शिबिरासाठी केवळ शंभर रुपये इतके अल्प फीस आकारून नाव नोंदणी करता येणार आहे त्यामुळे या शिबिराचा गरजू रुग्णांनी लाभ घ्यावा असे आवाहन आनंदऋषीजी डायग्नोस्टिक सेंटरच्या वतीने करण्यात आले आहे. नावनोंदणीसाठी मोबाईल क्र. ८२६२००९०९१ येथे संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## कवडगाव येथील जि.प.शाळेतील शौचालयाची दुरावस्था

**वडवणी । प्रतिनिधी**

**वडवणी तालुक्यातील कवडगाव हे पंचायत समिती सर्कलचे गाव असून या ठिकाणी जिल्हा परिषदेची सातवीपर्यंत शाळा असून या शाळेत गेल्या अनेक वर्षापासून स्वच्छालयाची दुरावस्था झाली आहे. शाळेला स्वच्छालय नसल्यामुळे विद्यार्थी विद्यार्थिनींची गैरसोय होत आहे. या गंभीर घटनेची दखल संबंधित शिक्षक विभागाने घ्यावी तसेच गेल्या चार-पाच महिन्या पूर्वी स्वच्छालय उभारण्यासाठी रेडिमेट सामायन शाळेत येऊन पडले आहे. अजून पर्यंत शाळेसाठी स्वच्छालय उभारले नाही.हे सामायन शाळेत टाकून संबंधित कंत्राटदार पसार झाला असल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे. हे सामान अक्षरशा खराब होत आहे. यामध्ये सिमेंटचे पोते. लोखंडी अँगल. पाण्याच्या टाक्या. पाईप. दरवाजे सह इतर सामायन खराब होत आहे.**

या शाळेत तात्काळ स्वच्छालय उभारावे अशी मागणी कवडगाव ग्रामपंचायत सदस्य तथा पत्रकार सतीष सोनवणे. मच्छिंद्र कानडे. अनिल नांदुरकर. गंगुबाई करे यांनी वडवणी गटशिक्षणाधिकारी उजगरे सर यांच्याकडे लेखी स्वरुपात केली आहे.. तसेच या शाळेसाठी विद्यार्थ्यांना पिण्याच्या पाण्यासाठी फिल्टर आलेले असून ते फिल्टरसुद्धा बसवण्या अभावी धुळखात पडले आहे. ते फिल्टर सुद्धा खराब होण्याची शक्यता आहे. वडवणी तालुक्यातील अनेक जिल्हा परिषद शाळेसाठी रेडिमेट शौचालय व पिण्याच्या पाण्याचे फिल्टर आलेले असून हे साहित्य संबंधित कंत्राटदार शाळेत टाकून पसार झाला आहे. वडवणी तालुक्यातील कवडगाव.पिंपरखेड. पुसरा.जिल्हा परिषद शाळेला आलेले रेडिमेट शौचालय व पिण्याच्या पाण्याचे फिल्टर तात्काळ बसून घ्यावे असे लेखी निवेदन ग्रामपंचायत सदस्य तथा पत्रकार सतीष सोनवणे यांनी वडवणीचे गटशिक्षण अधिकारी बाबासाहेब उजगरे यांना निवेदनाद्वारे केली आहे.

## केज-अंबाजोगाई विधानसभा मतदारसंघाचे आमदार व त्यांचे रिमोट एकनिष्ठतेपासून कोसोदूर-ॲड.शेख शफीक भाऊ

**केज/अंबाजोगाई ।प्रतिनिधी**

**एआयएमआयएम पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष ड. शेख शफिक भाऊ यांचा बीड जिल्हा दौरा नुकताच आयोजित करण्यात आला होता. या दौऱ्यादरम्यान केज-अंबाजोगाई विधानसभा मतदारसंघात घेतलेल्या बैठकीत शफिक भाऊंनी वरील उद्गार काढले.**

या बैठकीत जिल्हा मुख्य प्रवक्ते तथा अंबाजोगाई प्रभारी शेख रमीज सर, अंबेजोगाई शहराध्यक्ष हिफाजत पठाण, केज शहराध्यक्ष तालेब इनामदार, केज कार्याध्यक्ष शाकेर कुरैशी, अंबाजोगाई युवक शहराध्यक्ष फहीम शेख, नेकनुर सर्कल अध्यक्ष अन्वर हाशमी, केज चे सय्यद सोहेल, रईस शेख, सय्यद आजीम, शहेबाज शेख, फेरोज पठाण, तय्यब पठाण, रमजान पठाण, शेख खाजा, शफियोद्दीन इनामदार, नय्यर इनामदार, आझम बागवान, नाजेम शेख, समीर शेख, आमेर तंबोली, नेकनुर चे वाजेद भाई, वसीम भाई, आमेर भाई, सय्यद सलाम, सय्यद आदील, अजीम दादा, रमजान भाई यांच्यासह अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केज-अंबाजोगाई विधानसभा मतदारसंघातील पक्षाच्या पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना शफिक भाऊ म्हणाले की, विधानसभा निवडणुका लवकरच होणार आहे. यासाठी पक्षाचे प्रत्येक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी खांद्याला खांदा लावून जनतेसह पक्षाची कामे करावीत. अडीअडचणी सोडवाव्यात. आगामी विधानसभा निवडणूक एमआयएम पक्ष संपूर्ण ताकदीनिशी लढणार आहे. याकरिता प्रत्येकाने तन-मन-धन झोकून काम करायचे आहे. येथील विधानसभा मतदारसंघाच्या विद्यमान आमदार व त्यांचे रिमोट एकनिष्ठतेपासून कोसोदूर असून आजपर्यंतचा त्यांचा राजकीय प्रवास पाहता विरोधकांसह जनतेला ही लक्षात येते की ते स्वतःच्या फायद्यासाठी कपडे बदलल्यासारखे पक्ष बदलतात. कधी एका पक्षात तर कधी दुसऱ्या पक्षात. अशा कोलांटउड्या सातत्याने यांच्याकडून सुरू असतात. सध्या भाजपला अनुकूल वातावरण नसल्याचे पाहून यांनी पुन्हा एकदा उडी मारून दुसऱ्या पक्षात जाण्याचे ठरविले आहे. लवकरच ही बाब जनतेसमोर येणार आहे. असेही ड. शेख शफीक भाऊ म्हणाले. या मतदारसंघात गेल्या अनेक वर्षांपासून जनता मुंदडा कुटुंबीयांना साथ देत आहे. सध्या असलेल्या आमदार ताईंच्या सासू

या मतदारसंघात अनेक वर्षे आमदार राहिल्या होत्या. त्यांच्यानंतर आता त्यांच्या सुनबाई येथे प्रतिनिधित्व करीत आहेत. त्यांना गेल्या पाच वर्षाच्या काळात मतदार संघासाठी, मतदार संघातील जनतेसाठी ठोस आणि भरीव असे कार्य करता आले नाही. मात्र गेल्या महिन्या-दोन महिन्यांपासून या आमदार ताई सातत्याने प्रसिद्धी माध्यमातून आपल्या रिमोट कंट्रोल द्वारे बातम्यांचा रतीब घालीत आहेत. म्हणजे केले काही नाही पण प्रसिद्धी माध्यमातून नुसता कालवाच सुरू आहे. असा टोमणाही शफिक भाऊंनी मारला. जनहिताची कामे फक्त एमआयएम पक्षच करू शकतो. आपला पक्ष मजबूत करण्यासह जनतेसाठी विकासाची कामे आपल्याला करायची आहेत. ही गोष्ट लक्षात घ्यावी आणि विधानसभा निवडणुकीसाठी तयारीला लागावे. जिथे कुठे पक्षश्रेष्ठींचे मार्गदर्शन हवे असेल तिथे सांगावे. मार्गदर्शन करण्यासाठी सर्व पक्षश्रेष्ठी आणि वरिष्ठ पदाधिकारी सदैव तत्पर व तयार आहेत. असेही शफिक भाऊंनी सांगितले. यामुळे तालुक्यातील सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांमध्ये उत्साह व आत्मविश्वास संचारलेला पहावयास मिळाला. यावेळी बीडहून शफिक भाऊंसह आलेले युवक जिल्हाध्यक्ष तथा नगरसेवक शेख मतीन, ज्येष्ठ नेते अब्दुस्सलाम सेठ, जिल्हा समन्वयक सय्यद सैफअली उर्फ लालु भैय्या, बीड शहर उपाध्यक्ष शेख शाकेर, जिल्हा सहसचिव अन्वर पाशा, मराठवाडा सोशल मीडिया एडमिन शेख मुदस्सिर, सय्यद अब्दुस्सलाम, सय्यद आदील, सोहील मोमीन यांचीही प्रमुख उपस्थिती होती.

## बीडमध्ये वीरशैव स्मशानभूमीत २ खोल्यांच्या बांधकामाचे भूमिपूजन

### डॉ.योगेश क्षीरसागर यांनी निधी उपलब्ध करून दिल्याने अनेक वर्षांचा प्रश्न मार्गी

**बीड । प्रतिनिधी**

**शहरातील वीरशैव समाजाच्या स्मशानभूमीमध्ये दोन खोल्यांच्या बांधकामाचे भूमिपूजन राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या हस्ते मंगळवारी (दि.६) दुपारी ३ वाजता करण्यात आले. स्मशानभूमीमध्ये खोल्या उभारण्याची समाजाची मागणी होती. यासंदर्भात समाजाच्या शिष्टमंडळाने डॉ.क्षीरसागर यांची भेट घेऊन निधीची मागणी केली होती. क्षीरसागरांनीही समाजभावनेचा आदर करुन खोली बांधकामासाठी तत्काळ १० लाखांचा निधी उपलब्ध करुन दिला आणि प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली.**

शहरातील कंकालेश्वर मंदिराच्या मागील बाजूस वीरशैव लिंगायत समाजाची स्मशानभूमी आहे. स्मशानभूमीत अंतर्गत रस्ते, पाण्याची सुविधा, निवारा नसल्याने अंत्यविधीस येणाऱ्या नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. पावसाळ्यात तर मोठे हाल होतात. केवळ स्मशानभूमीला कंपाऊंचे काम झालेले आहे. भौतिक सुविधांसोबतच स्मशानभूमीत दोन खोल्या उभारणे गरजेचे आहे. यामुळे वीरशैव लिंगायत वाणी समाजाचे अध्यक्ष रामेश्वरअप्पा कानडे यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांची भेट घेऊन स्मशानभूमीतील दुरवस्थेबाबत माहिती दिली. तसेच, दोन खोल्यांचे बांधकाम करण्याची मागणी केली होती. त्यानुसार डॉ.क्षीरसागर यांनी तत्काळ वीरशैव स्मशानभूमीत दोन खोल्यांचे बांधकाम सुरू करण्याचे नियोजन केले. या कामाचे भूमिपूजन त्यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी वीरशैव लिंगायत वाणी समाजाचे अध्यक्ष रामेश्वरअप्पा कानडे, अशोक चिपाडे, शिवाप्पा भुरे, अशोक शहागडकर, बाळूशेट मिटकरी, अनिल मिटकरी, उत्तरेश्वर कानडे, नागेश मिटकरी, पशुपती मिटकरी, दिनेश राजमाने, अमर ढेपे, अनंत शहागडकर, अमोल होनराव, अमोल गलधर, ज्ञानेश्वर राऊत, साजेद जागीरदार, भारत शेटे, सुरेश कानडे, दिनेश राजमाने, शुभम कुलथे, दिलीप ढेपे, चंदू विभुते, अनंत शहागडकर, महारुद्र घेवारे, महेश डोंगरे, श्रीकृष्ण पताळे, सोमनाथ कानडे, सचिन रेगुडे, रवींद्र कानडे, बाळू स्वामी, योगेश बारस्कर, अमित कानडे, विद्याभूषण बेदरकर आदी उपस्थित होते.

# पवनचक्की कंपन्यांच्या दडपशाही विरोधात कानडीघाट शेतकरी आक्रमक

## नुकसानभरपाईची मागणी, पोलिस फौजफाटा गावात दाखल

चौसाळा । प्रतिनिधी

**बालाघाटावर पवनचक्की कंपन्यांचे मोठ्या प्रमाणावर पेव फुटले असुन पवनचक्की कंपन्यांच्या मनमानी कारभार विरोधात आज दि.८ गुरुवार रोजी कानडीघाट येथील शेतकरी आक्रमक झाले असुन त्यांनी टॉवरची तार ओढण्याचे काम बंद पाडले असून अगोदर आम्हाला आमच्या शेतातील टॉवर उभारणी कामाचा तसेच उभ्या पिकातुन तार ओढणीचे काम केल्यास पिकांचे नुकसान होणार असुन अगोदर भरपाई द्या त्यानंतरच तार ओढण्याचे काम करा अशी भूमिका घेतली .पवनचक्की कंपन्यांनी अरेरावीची भाषा करत सुरूवातीला दंडेलशाही पद्धतीने काम रेटण्याचा प्रयत्न केला त्यामुळे शेतकरी आणखीनच आक्रमक झाले. पवनचक्की कंपन्यांच्या आधिका-यांनी पोलिसांना पाचारण केल्यानंतर गावात मोठ्या प्रमाणावर पोलीस पाऊस फाटा जमा झाला होता त्यामुळे गावामध्ये काहीकाळ तणावाचे वातावरण होते. अखेर पवनचक्की कंपन्यांचे अधिकारी व कर्मचारी काम न करताच निघून गेले.**

गोलंग्री,कानडीघाट,सुलतानपुर या गावांमध्ये ओ २ कंपन्यांचे टॉवर उभारणे आणि तार ओढण्याचे काम सुरू असून शासकीय परीपत्रकाप्रमाणे नुकसान भरपाई देण्यासाठी ३५ मीटर रूंदीचा नियम असताना जुने शासकीय परीपत्रके दाखवून १६ मीटर प्रमाणे नुकसान भरपाई घ्या म्हणतात तसेच याठिकाणी उभारलेल्या २६ टावर उभारण्यात आले असुन प्रत्येकाला नुकसान भरपाईचा मोबदला वेगवेगळा दिलेला आहे. गंभीर बाब म्हणजे या शेतकऱ्यांकडे करारनाम्याची प्रत नाही दिशाभूल करून सह्या घेतलेल्या आहेत.मे मध्ये ज्या शेतकऱ्यांच्या शेतात टावरचे काम झाले आहे त्यांना अद्याप मोबदला देण्यात आलेला नाही. एकंदरीतच शेतक-यांच्या अज्ञानाचा गैरफायदा कंपन्यांचे अधिकारी घेत असुन पोलिस प्रशासन शेतकऱ्यांच्या पाठीशी न उभे राहता कंपन्यांच्या बाजुने उभे रहाताना दिसत आहे. असे मत श्रीकांत कवडे यांनी व्यक्त केले. ओ २ कंपन्यांचे अधिकारी आणि कर्मचारी आमच्या उभ्या पीकातुन विद्युत तार ओढण्यासाठी आलेले असुन उन्हाळ्यात टावर उभारणीचे काम पूर्ण झालेले असताना तेव्हा तार ओढण्याचे काम न करता सध्या आमच्या उभ्या पिकातुन तार ओढण्यासाठी आलेले असुन आमच्या पिकांची नुकसान भरपाई द्यावी किंवा पिक काढल्यावर तार ओढण्याचे काम करण्यात यावे अशी आमची मागणी असुन कंपन्यांचे अधिकारी पोलिस फौजफाटा बोलावून दमबाजी करत तार ओढण्याचा प्रयत्न करत असुन आम्ही ग्रामस्थांनी तो हाणुन पाडला असुन आम्हाला नुकसान भरपाई मिळाल्याशिवाय काम करू न देण्याचा पवित्रा ग्रामस्थांनी घेतला आहे. असे विठ्ठल झोडगे यांनी सांगितले. कानडीघाट येथील शेतकरी सुभाष रामभाऊ झोडगे यांना ६ लाख रूपयांचा धनादेश दि.१० जुन २०२४ रोजी दिला होता. सुभाष यांचे वडील रामभाऊ यांना बार्शी येथील दवाखान्यात उपचारासाठी दाखल करण्यात आले असुन उपचारासाठी पैसे काढण्यासाठी धनादेश बँकेत जमा केला असता खात्यावर पैसे नसल्याने वटला नाही.यापुर्वीही दोन वेळा अशा घटना घडलेल्या आहेत.त्यामुळे कंपनीच्या आर्थिक व्यवहार विषयी शेतकऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे.व्यवहार संशयास्पद असल्याने शेतकरी चिंताग्रस्त आहेत. बालाघाटावर सध्या पवनचक्की प्रकल्प उभरणा-या कंपन्यांचे पेव फुटले असुन परराज्यातील कंपन्या स्थानिक दलालांना हाताशी धरून अशिक्षित शेतकऱ्यांना लालुच दाखवून त्यांची दिशाभूल करून जमिनी ताब्यात घेत असुन पोलिस प्रशासनाच्या बळाचा गैरवापर करत दमदाटी करण्याचा प्रयत्न करत आहेत तसेच राजकीय लोकांचे कार्यकर्ते यांच्या मार्फत दबाव तंत्राचा वापर जमिनी बळकावण्यासाठी करत असल्याच्या तक्रारीत वाढ झाली आहे. राजकीय शक्तींचा वापर करून शेतकऱ्यांना खोटे गुन्हे दाखल करण्याच्या धमक्या देत असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. शेतक-यांच्या पाठीशी उभे राहण्याऐवजी आर्थिक लाभापोटी कंपन्यांची पाठराखण करताना दिसुन येत असल्याची खंत डॉ.गणेश ढवळे यांनी व्यक्त केली.

# सहाय्यक दुय्यम निबंधक वर्ग-२ बीड क्र. १चा मनमानी कारभार

## न्यायालयीन प्रविष्ट असलेली मालमत्ता महिलेची संगमत करून केले बोगस खरेदीखत

गेवराई । प्रतनिधी

**सहाय्यक दुय्यम निबंधक वर्ग -२ बीड क्र. १ यांनी न्यायालयीन प्रविष्ट असलेली मालमत्ता बनावट नामे पुष्पा हरिश्चंद्र विद्यासागर या महिलेची संगमत करून बोगस खरेदी खत क्रमांक १५६६/२०२४ केले. त्यामुळे या सर्व प्रकारची चौकशी करून ते रद्द करण्यात यावे अशी मागणी प्रतिक हरिश्चंद्र विद्यासागर राहणार बीड यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे.**

सहाय्यक दुय्यम निबंधक वर्ग-२ बीड क्र.१ यांच्याकडे रजिस्ट्रीसाठी लागणाऱ्या कागदपत्राची विचारणा केली असता त्यांनी प्रतीक हरिश्चंद्र विद्यासागर यांना सरकारी नियमानुसार आधार कार्ड, पॅन कार्ड, आणि नावात बदल असल्यास महाराष्ट्र शासन राजपत्र प्रमाणपत्र असेल तरच खरेदी विक्री खत करता येते असे सांगितले. यावेळी प्रतीक यांनी खरेदी खत क्र. १५६६/ २०२४ ही दाखवून त्यांना विचारणा केली की ह्या खरेदी खता मध्ये एक पण कागदपत्राची पूर्तता केलेली नाही त्यावर संबंधित सहाय्यक दुय्यम निबंधक वर्ग-२ बीड क्र. १ यांनी मला उडवा उडवी ची उत्तरे दिली संबंधित खरेदी खत क्र. १५६६ / २०२४ मध्ये संबंधित सहाय्यक दुय्यक निबंधक वर्ग -२ क्र. १ यांनी बनावट नामे पुष्पा हरिश्चंद्र विद्यासागर यांच्याकडून स्वराज्य महिला नागरी पतसंस्था मर्या, बीड शाखा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बीड येथे सेव्हिंग खाते असलेले पासबुकची झेरॉक्स कॉपी घेतली संबंधित पतसंस्थेत कागदोपत्री विचारणा केली असता खाते उघडण्यासाठी पुष्पा हरिश्चंद्र विद्यासागर या नावाने आधार कार्ड, पॅन कार्ड, मतदान कार्ड राशन कार्ड हे सरकारी नियमानुसार लागणारी कागदपत्रे दिलेली नाहीत हे एवढ्यावर न थांबता त्यांनी पुष्पा हरिश्चंद्र विद्यासागर या बनावट नावाच्या महिलेकडून शंभर रुपयाच्या बॉण्डवर तीन नावाची व्यक्ती एकच असल्याचे शपथपत्र घेतले व त्यात असे दाखवले की माहेरकडील नाव पुष्पा सुखदेव चक्रे आणि सासरकडील नाव पुष्पा जयप्रकाश सोनवणे व लिव्ह अँड रिलेशनशिप मधील नाव पुष्पा हरिश्चंद्र वास्तव पाहतात त्यात त्यांनी मा. न्यायालयाचे लिव्ह अँड रिलेशनशिप मध्ये राहत असल्याचा वैद्य असलेला कोणताही पुरावा जोडलेला नाही किंवा महाराष्ट्र शासन राजपत्र प्रमाणपत्र जोडलेले नाही. सदरील जागेच्या बाबतीत मा.दिवाणी न्यायालय व. स्तर न्यायालयात दावा क्र. ७७९/ २०२३ चालू आहे. तरी सुद्धा सहाय्यक दुय्यद दुय्यम निबंधक वर्ग-२ क्र.१ बीड यांनी खरेदी विक्रीचा व्यवहार केलेला आहे. तरी हा सर्व प्रकार बनावट असल्याचे दिसून येते. मा. जिल्हाधिकारी साहेबांनी या विषयात लक्ष घालून संबंधित सहाय्यद दुय्यम निबंधक वर्ग-२ क्र. १ यांची कायदेशीर चौकशी करून संबंधित खरेदीखत क्रमांक १५६६/ २०२४ हे रद्द करावे असे निवेदन प्रतीक हरिश्चंद्र विद्यासागर यांनी दि. २४ जुलै २०२४ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय येथे दिले आहे.

# महसूल विभागाने दप्तर दिरंगाई थांबवून योजनांचा लाभ द्यावा

## संजय गांधी, श्रावणबाळ, आत्महत्याग्रस्त, दिव्यांग योजनेसाठी लाभार्थी प्रतीक्षेत

बीड । प्रतिनिधी

**महसूल विभागाच्या मार्फत राबवल्या जाणाऱ्या विविध योजनांच्या संदर्भात विभागाकडून दप्तर दिरंगाई केली जात असून अनेक पात्र नागरीक लाभाच्या प्रतीक्षेत आहेत.अर्जप्रक्रिया आणि प्रस्ताव निकषपात्र असताना अनेक लाभार्थ्यांना विभागाच्या अनास्थेमुळे त्रास सहन करावा लागत असून यावर आ. संदिप क्षीरसागर यांनी तातडीने सर्व प्रकरणे निकाली काढून लाभार्थ्यांना, लाभ वितरित करा अशा सूचना दिल्या आहेत.**

बीड मतदारसंघ क्षेत्रातील बीड आणि शिरूर का. तहसील अंतर्गत अनेक निकषपात्र नागरिकांनी संजय गांधी निराधार अनुदान योजना , श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबासाठी असलेल्या विविध योजना, दिव्यांग बांधवांसाठीच्या योजना इत्यादी योजनांसाठी अर्ज व प्रस्ताव दाखल केलेले आहेत. परंतु महसूल विभाग आणि तहसील प्रशासनाच्या दिरंगाई आणि अनास्थेमुळे गेल्या अनेक दिवसांपासून हे प्रस्ताव प्रलंबित आहेत. यामुळे पात्र असलेल्या लाभार्त्यांना लाभापासून वंचित राहावा लागत आहे व विनाकारण त्रास सहन करावा लागत आहे. हि बाब लक्षात घेता आ. संदीप क्षीरसागर यांनी यासंदर्भात तात्काळ कार्यवाही करून संबंधित नागरिकांना लाभाचे वितरण करावे अशा सूचना बीड व शिरूर (का.) तहसीलदारांना दिल्या आहेत. तसेच याबाबत आ.क्षीरसागर यांनी विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकारी यांच्याकडेही पत्रव्यवहार केला आहे.

# प्रा. मधुकर राळेभात यांचा वाढदिवस विविध उपक्रमाने होणार साजरा- जाधव

जामखेड । प्रतिनिधी

**ज्येष्ठ नेते तथा माजी जिल्हा परिषद सदस्य प्राध्यापक मधुकर (आबा)राळेभात यांच्या वाढदिवसानिमित्त दि.११ ऑगस्ट २०२४ रोजी विविध उपक्रम राबवून वाढदिवस साजरा करण्यात येणार आहे.अशी माहिती नगर परिषद चे माजी नगरसेवक अमित जाधव यांनी दैनिक सुर्योदय न्यूज ला दिली आहे.**

या मध्ये धाकटी पंढरी (धनेगाव) येथे वृक्षारोपण तसेच महावीर भवन येथे धाकटी पंढरी (धनेगाव) या ठिकाणी दिंड्या घेऊन जाणाऱ्या महाराजांचा सन्मान, विविध क्षेत्रातील गुणवंताचा सत्कार,अनाथ, निराधार बालकांना अल्पोपहार,पत्रकार सन्मान असे विविध समाजोपयोगी उपक्रम राबवून वाढदिवस साजरा करण्यात येणार आहे. जामखेड शहरातील महावीर भवन येथे वार रविवार दि.११ ऑगस्ट २०२४ रोजी दुपारी ३.०० वाजता जेष्ठ नेते प्राध्यापक मधुकर ( आबा) राळेभात यांचा अभिष्टचिंतन सोहळा आयोजित करण्यात आला असून नागरिकांनी उपस्थित राहावे ही विनंती.

# कर्जत जामखेडसह इतरही ठेवीदारांसाठी रोहित पवार मैदानात

## ज्ञानराधा मल्टिस्टेट सोसायटीवर कारवाईची राज्यपालांकडे मागणी

कर्जत जामखेड । प्रतिनिधी

**बीड येथील ज्ञानराधा मल्टिस्टेट को-ऑप.क्रेडिट सोसायटीमध्ये कर्जत-जामखेड मतदारसंघातील सर्वसामान्य खातेदारांचे ९० कोटी रूपये अडकले असून या खातेदारांसह इतरही खातेदारांचे हक्काचे पैसे परत देण्यात यावेत आणि या संस्थेसह अशा सर्वसामान्य जनतेची फसवणूक करणाऱ्या संस्थांची चौकशी करून कडक कारवाई करण्याची मागणी आमदार रोहित पवार यांनी राज्यपाल सी.पी राधाकृष्णन यांच्याकडे केली. याबाबत रोहित पवार यांनी आज राज्यपाल महोदयांची भेट घेऊन त्यांच्याशी सविस्तर चर्चा केली आणि याबाबतचे पत्र त्यांना दिलं.**

बीडमधील ज्ञानराधा मल्टिस्टेट को-ऑप.क्रेडिट सोसायटीमध्ये कर्जत-जामखेड मतदारसंघातील सुमारे साडेसहा हजारहून अधिक सभासद असून त्यांच्या सुमारे ९० कोटी रुपयांच्या ठेवी आहेत. हे सर्व खातेदार शेतकरी, कामगार व सामान्य कुटुंबातील आहेत. या सर्व खातेदारांनी आपली आयुष्याची पुंजी साठवून त्या संस्थेमध्ये दिली होती.काहींनी आपल्या मुलाच्या शिक्षणासाठी, मुलीच्या लग्नासाठी तर काहींनी आपल्या आरोग्यासाठी पैसे साठवून ठेवावेत या हेतून या संस्थेमध्ये ठेवीच्या स्वरूपात पैसे ठेवले होते. परंतु या संस्थेने हे पैसे इतरत्र वळवल्याने सर्वसामान्य खातेदारांना आपलेच हक्काचे पैसे मिळत नसल्याने ते अडचणीत आले आहेत. या सर्व ठेवीदारांनी आमदार रोहित पवार यांची भेट घेऊन यात घालण्याची मागणी केली होती. त्यांनंतर लगेचच या विषयांसंदर्भात आज आमदार रोहित पवार यांनी राज्यपाल सी.पी राधाकृष्णन यांची भेट घेतली आणि सविस्तर चर्चा केली. सामान्य ठेवीदारांची फसवणूक करणाऱ्या या आणि अशा इतरही संस्थांची चौकशी करुन त्यांच्यावर योग्य ती कारवाई करावी आणि कर्जत जामखेड मतदारसंघातील ठेवीदारांसह फसवणूक झालेल्या सर्वांचेच पैसे परत मिळण्यासाठी सहकार्य करण्याची विनंती आमदार रोहित पवार यांनी राज्यपाल महोदयांकडे केली. याबाबतचे पत्र त्यांनी राज्यपाल महोदयांना दिले आहे. राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांनी यासंदर्भातील माहीती मागवून लवकरच प्रशासनाला योग्य त्या सूचना देण्याचे आश्वासन दिले असल्याचे आमदार रोहित पवार यांनी म्हटले आहे.

# शेतकऱ्यांना योग्य ती नुकसान भरपाई मिळवून द्यावी;अन्यथा मनसे स्टाईल आंदोलन

जामखेड । प्रतिनिधी

**या वर्षी जामखेड तालुक्यात सतत च्या पावसामुळे भरपूर पाऊस झाल्याने खरिपाच्या पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. शेतांमध्ये पावसाचे पाणी साचुन राहिलेले आहे. ज्यामुळे पिके सडून गेली आहेत. यामुळे जामखेड तालुक्यात शेतकरी वर्गात निराशा व चिंता निर्माण झालेली आहे. त्यामुळे ओला दुष्काळ जाहीर करावा, अशी निवेदनाद्वारे मागणी महाराष्ट्र नवनिर्माण शेतकरी सेनेच्या वतीने तहसीलदार गणेश माळी यांना करण्यात आली आहे.**

जामखेड तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांच्या शेतीचे पंचनामे करून आपण राज्य सरकारला झालेल्या नुकसान भरपाई झालेली कळवावी व तालुक्यातील शेतकऱ्यांना योग्य ती नुकसान भरपाई मिळवून द्यावी अन्यथा मागण्या मान्य न झाल्यास महाराष्ट्र नवनिर्माण सेना मनसे स्टाईलने आंदोलन करू असा इशारा देण्यात आला. यावेळी मनसे तालुका अध्यक्ष प्रदीप टापरे, मनसे शेतकरी सेना तालुका अध्यक्ष भाऊसाहेब आमटे, उद्योजक तथा नेते पै. हवा सरनोबत, मनसे नेते लक्ष्मण कानडे, मनसे तालुका उपाध्यक्ष सनी सदाफुले, शहराध्यक्ष बालाजी भोसले,शहर उपाध्यक्ष अनिल पाटील, राहुल जगताप,राजु जाधव,राजू राऊत,पै. बालू साठे, मंगेश कदम आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शुक्रवारी 'घरो घरी तिरंगा' या उपक्रमातंर्गत तिरंगा रॅलीचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर मागील काही वर्षांपासून घरो घरी तिरंगा हा उपक्रम राबविण्यात येत आहे. यातंर्गत उद्या शुक्रवारी तिरंगा रॅली चे आयोजन छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगण येथुन करण्यात येत आहे.राज्यभर घरोघरी तिरंगा उपक्रम राबविण्यात येत असून या अतंर्गत बीडमध्ये शुक्रवारी सकाळी १०:३० वाजता छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगण येथुन या उपक्रमाचा शुभारंभ होणार असून ही रॅली पुढे कारंजा-भाजीमंडई मार्ग-छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुल यामार्गास जाणार आहे. घरो घरी तिरंगा या उपक्रमाअंतर्गत तिरंगा रॅली , तिरंगा मॅरेथॉन, तिरंगा सांस्कृतिक कार्यक्रम, तिरंगा कॅनव्हास, तिरंगा प्रतिज्ञा, तिरंगा सेल्फी, तिरंगा सेल्फीज, तिरंगा ट्रिब्युट, तिरंगा मेळा असे उपक्रम राबविण्यात येणार आहे. या तिरंगा रॅलीमध्ये बीडच्या नागरीकांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन जिल्हा प्रशासनाने किया केले आहे.

# भोमिया मंदिर खाटीक समाज, खेरवाडी आयोजित हरियाली तीज महोत्सव

मुंबई । प्रतिनिधी

**खेरवाडी भोमिया मंदिर खाटीक समाजातर्फे रंगीत हरियाली तीज महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. हरियाणा राजस्थानी खाटीक समाज संघाच्या वतीने पारंपारिक गाणी व नृत्यासह पवित्र श्रावण महिन्यातील या स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमात महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून मेघाश्रेय फाऊंडेशनच्या संस्थापिका आणि सामाजिक कार्यकर्त्या सीमा सिंग होत्या. कार्यक्रमाला टीना वसंत राजोरा, कोमल अनिल सोलंकी, लक्ष्मी सुनील सोळंकी, रेखा महेश राजोरा, कोमल महेश भेवाल आदींची प्रमुख उपस्थिती होती.**

यावेळी सीमा सिंह म्हणाल्या की, खाटीक समाज संघाच्या कार्यक्रमाला येणे नेहमीच विशेष असते. तुमच्या लोकांची संस्कृती, गाणी आणि संगीत या सर्वांचा माझ्यावर खूप प्रभाव आहे. आज देशातील मुली देशासाठी ऑलिम्पिक पदके घेऊन येत आहेत. सर्वांना शुभेच्छा देताना मी सांगू इच्छितो की, तुम्हा सर्वांनी तुमच्या परंपरा पुढच्या पिढीपर्यंत नेल्या पाहिजेत.

# परळीला मनमानी आणि गुंडगिरी पासून मुक्त करायचंय-ॲड. शेख शफीक भाऊ

परळी । प्रतिनिधी

**एआयएमआयएम पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष ॲड. शेख शफिक भाऊ यांचा बीड जिल्हा दौरा नुकताच आयोजित करण्यात आला होता. या दौऱ्यादरम्यान परळी विधानसभा मतदारसंघात घेतलेल्या बैठकीत शफिक भाऊंनी वरील उद्गार काढले.**

या बैठकीत पक्षाचे परळी तालुकाध्यक्ष शेख शरीफ व शहराध्यक्ष कादर कुरेशी, परळीचे कार्याध्यक्ष फेरोज खान, ज्येष्ठ नेते अश्फाक सेठ, इस्तियाक भाई, सईद भाई, युवक शहराध्यक्ष शेख अन्वर, युवा नेते शेख मोहसीन, युवा नेते तौफीक भाई, नेहाला भाई, अतीक भाई, बीड सोशल मिडियाध्यक्ष सोहेल शिकलकर, बांधकाम शहराध्यक्ष सय्यद बासेद यांच्यासह अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर परळी विधानसभा मतदारसंघातील पक्षाच्या पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना शफिक भाऊ म्हणाले की, विधानसभा निवडणुका लवकरच होणार आहे. यासाठी पक्षाचे प्रत्येक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी खांद्याला खांदा लावून जनतेसह पक्षाची कामे करावीत. अडीअडचणी सोडवाव्यात. आगामी विधानसभा निवडणूक एमआयएम पक्ष संपूर्ण ताकदीनिशी लढणार आहे. याकरिता प्रत्येकाने तन-मन-धन झोकून काम करायचे आहे. आपण पाहतच आहात की, गेल्या काही वर्षांपासून परळी विधानसभा मतदारसंघात मुंडे

बहीण-भावाची मोठ्या प्रमाणात मनमानी हुकूमशाही आणि त्यांच्या चेल्यापेल्यांची गुंडगिरी सुरू आहे. यामुळे सर्वसामान्य गोरगरीब परळीकरांना जीव मुठीत घेऊन जगावे लागत आहे. हे बहिण भाऊ स्वतःच्या मनाला येईल तेव्हा कधी कोणी विधानसभेत तर कधी कोणी विधान परिषदेत अशाप्रकारे खांदेपालट करून जनतेला मूर्खात काढत आहे. यांच्या हुकूमशाही मधून परळीकरांना बाहेर काढायचे आहे. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत येथे झालेल्या मतदानाची आकडेवारी पाहता येथे कशा प्रकारचे राजकारण केले जाते हे सर्वांना दिसून आलेच आहे. या अवस्थेतून येथील जनतेला बाहेर काढण्यासाठी आपला एमआयएम पक्षच समर्थ आहे इतर पक्षात ती धमक नाही. जनहिताची कामे फक्त एमआयएम पक्षच करू शकतो. आपला पक्ष मजबूत करण्यासह जनतेसाठी विकासाची कामे आपल्याला करायची आहेत. ही गोष्ट लक्षात घ्यावी आणि विधानसभा निवडणुकीसाठी तयारीला लागावे. जिथे कुठे पक्षश्रेष्ठींचे मार्गदर्शन हवे असेल तिथे सांगावे. मार्गदर्शन करण्यासाठी सर्व पक्षश्रेष्ठी आणि वरिष्ठ पदाधिकारी सदैव तत्पर व तयार आहेत. असेही शफिक भाऊंनी सांगितले. यामुळे तालुक्यातील सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांमध्ये उत्साह व आत्मविश्वास संचारलेला पहावयास मिळाला. यावेळी बीडहून शफिक भाऊंसह आलेले युवक जिल्हाध्यक्ष तथा नगरसेवक शेख मतीन, ज्येष्ठ नेते अब्दुस्सलाम सेठ, जिल्हा समन्वयक सय्यद सैफअली उर्फ लालु भैय्या, बीड शहर उपाध्यक्ष शेख शाकेर, जिल्हा सहसचिव अन्वर पाशा, मराठवाडा सोशल मीडिया एडमिन शेख मुदस्सिर, सय्यद अब्दुस्सलाम, सय्यद आदील, सोहील मोमीन यांचीही प्रमुख उपस्थिती होती.

हे पत्र मालक, प्रकाशक संपादक गंगाधर सिताराम काळकुटे यांनी माऊली ऑफसेट प्रिंटर,एम.एस.ई.बी.ऑफीसजवळ, माळीवेस बीड-४३१ १२२ येथे छापून दैनिक महाराष्ट्र सूर्योदय, हॉटेल रायगड,जिल्हाधिकारी ऑफीससमोर, नगर रोड,बीड ४३११२२ येथे प्रकाशित केले. मुख्य कार्यालयः जिल्हाधिकारी कार्यालया समोर , नगर रोड,बीड४३११२२ संपादकः गंगाधर काळकुटे मो.९४२१२८२०२८, अंकामधील छापून आलेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.(वाद बीड न्यायकक्षेत)